


# हॅलो प्रभात

नवे विचार...नवी सुरुवात

RNI NO. MAHMAR/2020/79996

■ मुंबई ■ पुणे ■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ सोलापूर ■ अहिल्यानगर

हॅलो प्रभात LIVE

Hello Prabhat Media

Print - Electronic - Social

■ वर्ष : ०७ ■ अंक : ०१ ■ सोमवार, १३ एप्रिल २०२६ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४


# निर्णयप्रक्रियेत महिलांची ताकद वाढणार!

## नारी शक्ती वंदन अधिनियम ऐतिहासिक ठरणार

### महिलांना 33% प्रतिनिधित्व



मुंबई : हॅलो प्रभात

केंद्रातील मोदी सरकारच्या महिला सक्षमीकरणाच्या धोरणांना आता निर्णायक वळण मिळत असून 'नारी शक्ती वंदन अधिनियम' हा देशातील महिलांसाठी ऐतिहासिक पाऊल ठरणार आहे. या कायद्यामुळे महिलांचा केवळ सहभागच नाही, तर निर्णयप्रक्रियेत त्यांचा प्रभावही मोठ्या प्रमाणात वाढेल, असा ठाम विश्वास भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा आमदार चित्रा वाघ यांनी व्यक्त केला. भाजपा प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी महिला मोर्चाच्या विविध पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

चित्रा वाघ म्हणाल्या की, नारी शक्ती वंदन अधिनियमामुळे लोकसभा, राज्य विधानसभांमध्ये तसेच दिल्ली विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळणार आहे. यामुळे देशाच्या राजकारणात महिलांचे प्रतिनिधित्व अभूतपूर्व पातळीवर वाढेल. आतापर्यंत योजना लाभार्थी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महिला आता धोरणनिर्मितीच्या केंद्रस्थानी येतील, हीच खरी 'विकसित भारता'ची पायाभरणी ठरेल. त्या पुढे म्हणाल्या की, महिलांचा निर्णयप्रक्रियेत वाढलेला सहभाग हा केवळ संख्यात्मक बदल नसून गुणात्मक परिवर्तन घडवणारा ठरेल. महिलांच्या नेतृत्वामुळे शिक्षण, आरोग्य, पोषण, महिला सुरक्षा, पाणीपुरवठा आणि स्वच्छता यांसारख्या मूलभूत विषयांना अधिक प्राधान्य मिळेल. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षणाच्या माध्यमातून महिलांनी सक्षम नेतृत्व सिद्ध केले असून, आता तोच अनुभव राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर दिसून येईल.

मोदी सरकारच्या गेल्या दशकातील विविध योजनांचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, महिलांच्या सक्षमीकरणासाठी व्यापक आणि बहुआयामी काम झाले आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' मोहिमेमुळे मुलींच्या जन्मदरात आणि शिक्षणातील सहभागात वाढ झाली आहे. 'सुकन्या समृद्धी योजना'मुळे मुलींच्या भविष्यासाठी आर्थिक सुरक्षितता निर्माण झाली आहे. आरोग्य क्षेत्रात 'प्रधानमंत्री मातृ वंदना योजना' आणि 'पोषण अभियान' यांसारख्या उपक्रमांमुळे मातामृत्यू दरात घट झाली असून महिलांच्या आरोग्य स्थितीत सुधारणा झाली आहे. तसेच, 'प्रधानमंत्री जनधन योजना'मुळे कोट्यवधी महिला बँकिंग व्यवस्थेशी जोडल्या गेल्या असून 'मुद्रा योजना'मुळे महिला उद्योजकतेला चालना मिळाली आहे.

ग्रामीण भागात स्वयं-सहायता गटांच्या माध्यमातून महिलांनी आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारला आहे. 'लखपती दीदी' आणि 'नमो ड्रोन दीदी' यांसारख्या उपक्रमांनी महिलांना तंत्रज्ञान आणि नव्या क्षेत्रांमध्ये संधी उपलब्ध करून दिली आहे. याशिवाय, 'प्रधानमंत्री आवास योजना'मुळे महिलांच्या नावावर घरांची मालकी मिळत आहे, 'उज्ज्वला योजना'मुळे स्वच्छ इंधन उपलब्ध झाले आहे, तर 'जल जीवन मिशन'मुळे महिलांचा पाण्यासाठी होणारा वेळ आणि कष्ट कमी झाले आहेत. या सर्व योजनांमुळे महिलांच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा झाली असल्याचे त्यांनी नमूद केले. नारी शक्ती वंदन अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी झाल्यानंतर महिलांचे राजकीय सशक्तीकरण अधिक बळकट होईल आणि देशाच्या विकासात त्यांचा सक्रिय, निर्णायक आणि दूरदृष्टीपूर्ण सहभाग दिसून येईल, असा विश्वास चित्रा वाघ यांनी व्यक्त केला.

# संगीतविश्वातील सुवर्णयुग संपले

## आशा भोसले यांचा चिरतरुण आवाज काळाच्या पडद्याआड

- ८ दशकांचा सुरेल प्रवास थांबला
- २० भाषांतील हजारो गीतांनी रसिकांना घातली भुरळ



मुंबई : हॅलो प्रभात

भारतीय संगीतविश्वावर तब्बल आठ दशकांहून अधिक काळ अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या निधनाने संगीतसृष्टीवर शोककळा पसरली आहे. आपल्या जादुई आणि चिरतरुण आवाजाने कोट्यवधी रसिकांच्या मनावर राज्य करणारा एक युगपुरुषी स्वर काळाच्या पडद्याआड गेला आहे.

आशा भोसले यांनी २० हून अधिक भाषांमध्ये १२ हजारांहून अधिक गाणी गाऊन एक अद्वितीय विक्रम प्रस्थापित केला होता. त्यांच्या आवाजात विविधतेची अप्रतिम ताकद होती भावगीत, गझल, लावणी, पॉप, शास्त्रीय, तसेच चित्रपटसंगीत अशा सर्वच प्रकारांमध्ये त्यांनी आपली वेगळी छाप उमटवली. मंगेशकर कुटुंबातील स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर आणि आशा भोसले या दोन बहिणींनी अनेक दशकं रसिकांना आपल्या सुरांनी मंत्रमुग्ध केले. या दोघींनी मिळून भारतीय संगीतविश्वाला अभूतपूर्व समृद्धी दिली.

लहान वयातच वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची जबाबदारी सांभाळताना आशा भोसले यांनी गायनाची वाट धरली. अथक परिश्रम, जिद्द आणि प्रतिभेच्या जोरावर त्यांनी संगीत क्षेत्रात अढळ स्थान निर्माण केले. त्यांनी दिग्गज संगीतकारांसोबत असंख्य अजरामर गाणी दिली. एक हजारांहून अधिक चित्रपटांसाठी त्यांनी पार्श्वगायन केले.

त्यांच्या नावावर सर्वाधिक गाणी गाण्याचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये नोंद असून, फिल्मफेअर, पद्मविभूषण, महाराष्ट्र भूषण अशा अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले होते. आज त्या आपल्यात नसल्या तरी त्यांचा चिरतरुण आवाज, अजरामर गाणी आणि संगीतविश्वाला दिलेले अप्रतिम योगदान यामुळे आशा भोसले या कायम रसिकांच्या हृदयात जिवंत राहतील.

# संक्षिप्त...

## पाळीव कुत्र्याचा बिबट्याने पाडला फडशा

कोल्हापूर : हॅलो प्रभात

शाहुवाडी तालुक्यात मानव-वन्यजीव संघर्ष शिगेला पोहोचला असून तालुक्यातील कडवे पैकी पाटील वाडीत मध्यरात्रीच्या सुमारास एका बिबट्याने मानवी वस्तीत शिरकाव करून विशाल जयसिंग पाटील यांच्या पाळीव कुत्र्याला लक्ष्य करत जागीच ठार केले. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## उन्हाळा, त्यात मोहोळमध्ये विजेचा लपंडाव

सोलापूर : हॅलो प्रभात

मोहोळ शहरासह तालुक्यातील तापमानात गेल्याकाही दिवसांपासून अचानक वाढ झाल्याने उन्हाचा तडाखा प्रचंड वाढला असून तापमानाने ४० अंशांपर्यंत झेप घेतली आहे. त्यातच आता विजेचा लंपडाव सुरू झाल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून दुपारच्या वेळी रस्ते अक्षरशः ओस पडल्याचे दिसत आहेत. त्यामुळे लोक अत्यावश्यक कामांशिवाय घराबाहेर पडणे टाळत आहेत.

## सोलापुरात डायलेसिस युनिटचे काम अंतिम टप्प्यात

सोलापूर : हॅलो प्रभात

होटगी रोडवरील राज्य कामगार विमा योजनेच्या रूग्णालयात डायलेसिसच्या युनिटला मंजुरी मिळाली आहे. येथे आधुनिक पध्दतीच्या आठ मशीन्स दाखल झाल्या आहेत. यातील चार मशीन्स बसविण्यात असून अन्य चार बसवण्याचे कामही अंतिम टप्प्यात आहे. आठ मशिन्सच्या डायलेसिस युनिटमुळे त्याचा लाभ शहर जिल्ह्यातील साखर उद्योगांसह अन्य कंपन्यातील कामगारांना होईल. किडनीच्या आजाराने त्रस्त कामगार असलेल्या रूग्णांना व त्यांच्या कुटुंबातील अन्य सदस्यांवर पूर्णपणे मोफत डायलेसिसचे उपचार केले जाणार आहेत.

## राज्यात उन्हाचा तडाखा वाढला

मुंबई : हॅलो प्रभात

राज्यात सध्या कोरडे हवामान असून काही ठिकाणी उष्ण आणि दमट वातावरणाची नोंद होत आहे. मागील काही दिवसांच्या तुलनेत राज्यातील कमाल तापमानात वाढ झाली असून यामुळे तीव्र उन्हाचा तडाखा नागरिकांना सहन करावा लागत आहेत. उत्तर मध्य महाराष्ट्रातील कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली असून विदर्भ आणि मराठवाड्यातही उन्हाची काहिली वाढली आहे.

# 'शरद मल्टिस्पेशालिटी'मध्ये नेत्र व ईएनटी विभागाचा शुभारंभ

यड्राव : हॅलो प्रभात



येथील शरद आयुर्वेद मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर अंतर्गत कार्यरत शरद मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये आधुनिक वैद्यकीय सुविधांचा आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठण्यात आला असून, नेत्ररोग तसेच कान, नाक, घसा (ईएनटी) विभागाचे उद्घाटन संस्थेचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर अनिल बागणे यांच्या हस्ते संपन्न झाले.

या उद्घाटन प्रसंगी शरद आयुर्वेद कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रमोद कणप प्रमुख उपस्थिती होती. या नव्याने सुरू झालेल्या विभागांमध्ये अनुभवी तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली असून, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. कौस्तुभ पाटील, ईएनटी तज्ज्ञ डॉ. प्रविण ख्वैरकपम हे रुग्णांना सोमवार आणि गुरुवारी सायंकाळी ५ ते ७ काळात सेवा देणार आहेत.

यावेळी अनिल बागणे म्हणाले, शरद मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलने अल्पावधीतच रुग्णसेवेत विश्वासार्ह स्थान निर्माण केले आहे. रुग्णांना एकाच छताखाली सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने नेत्ररोग व ईएनटी विभागाची सुरुवात करण्यात आली आहे. या नव्या विभागांमुळे डोळ्यांचे विकार, दृष्टीदोष, तसेच कान, नाक व घशाशी संबंधित आजारांचे अचूक निदान आणि अत्याधुनिक उपचार स्थानिक पातळीवरच मिळणार आहेत.

ते पुढे म्हणाले, ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी, ही संस्थेची भूमिका असून, याच ध्येयाने हॉस्पिटलमध्ये सर्व तपासण्या, निदान सुविधा, उपचार आणि तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. भविष्यातही अत्याधुनिक तंत्रज्ञानासह सर्वसमावेशक व अधिक प्रगत आरोग्य सुविधा उपलब्ध करून देत, रुग्णसेवेचा दर्जा अधिक उंचावण्याचा संस्थेचा ठाम मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यामुळे अत्याधुनिक यंत्रसामग्री व तपासणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे अचूक निदान व परिणामकारक उपचार शक्य होणार आहेत. यावेळी विविध विभागांतील डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# नव कृष्णा व्हॅली स्कूलच्या विद्यार्थीचे NDA मध्ये यश



कुपवाड : हॅलो प्रभात

नव कृष्णा व्हॅली स्कूल येथील सन २०२२२३ बॅचचा विद्यार्थी शुभम सुरेश कोळेकर याची राष्ट्रीय संरक्षण अकादमीसाठी निवड झाली आहे.

जलंधर येथे पार पडलेल्या कठीण परीक्षेत त्याने उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचे तसेच आपल्या आई-वडिलांचे नाव अभिमानाने उंचावले आहे.

शुभमच्या या दैदीप्यमान यशाबद्दल सुरज फाउंडेशनचे अध्यक्ष प्रवीण लुंकड, संचालिका सौ. संगीता पागणीस तसेच नव कृष्णा व्हॅली स्कूलचे उपप्राचार्य प्रशांत चव्हाण, मुख्याध्यापिका सुनीता पाटील, राजेंद्र पाचोरे, विनायक जोशी यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी सुरज फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# मंत्री हसन मुश्रीफ यांचे महात्मा फुले पुतळ्यास अभिवादन

कागल : हॅलो प्रभात



महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त कागल येथील गैबी चौकातील पुतळ्यास मंत्री हसन मुश्रीफ यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी त्यांनी गैबी चौकातील महात्मा ज्योतिबा फुले, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यांनाही पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

या प्रसंगी कागल नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष विवेक लोटे, बच्चन कांबळे, रुपेश वाघमारे, अभिजित कांबळे, अंकुश कांबळे, सागर शिंदे यांच्यासह अन्य मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.

# एमआयटी एडीटीचा बेंटली सिस्टिम्ससोबत करार

## 'इन्फ्रास्ट्रक्चर इनोव्हेशन' उत्कृष्टता केंद्र सुरू

पुणे : हॅलो प्रभात



एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ (एमआयटी एडीटी) आणि जागतिक स्तरावरील इन्फ्रास्ट्रक्चर अभियांत्रिकी सॉफ्टवेअर क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी बेंटली सिस्टिम्स यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. याचवेळी 'इन्फ्रास्ट्रक्चर इनोव्हेशन सेंटर ऑफ एक्सलन्स' या उत्कृष्टता केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. डिजिटल पायाभूत सुविधा शिक्षणाला चालना देणे आणि उद्योग-संलग्न शिक्षण अधिक सक्षम करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड सायन्सेस अंतर्गत सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमास बेंटली सिस्टिम्सचे दक्षिण आशिया विभागीय कार्यकारी कमलकन्नन तिरुवडी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी शैक्षणिक संचालक हर्ष नागपाल, वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक मोनिका जेधे आणि परमर्थ सैनी हे मान्यवर उपस्थित होते.

एमआयटी एडीटी विद्यापीठाकडून कार्याध्यक्ष व प्र-कुलपती डॉ. मंगेश कराड, कार्यकारी संचालक डॉ. सुनीता कराड, प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, तसेच सिव्हिल इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. युवराज भिरूड आदी उपस्थित होते. या प्रसंगी 'इन्फ्रास्ट्रक्चर इनोव्हेशन सेंटर ऑफ एक्सलन्स' तसेच बेंटली स्टुडंट क्लबचे उद्घाटन करण्यात आले. या केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर, स्मार्ट कन्स्ट्रक्शन तंत्रज्ञान आणि शाश्वत अभियांत्रिकी क्षेत्रातील प्रगत शिक्षण व संशोधनाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. विद्यार्थ्यांना ६५ हून अधिक उद्योगमान्य सॉफ्टवेअर, जागतिक प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि विशेष तांत्रिक प्रशिक्षण सुविधांचा लाभ मिळणार आहे. प्रमुख पाहुणे कमलकन्नन तिरुवडी यांनी आपल्या भाषणात स्मार्ट शहरीकरणासाठी सॉफ्टवेअर-आधारित बुद्धिमान पायाभूत सुविधांचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. कार्याध्यक्ष व प्र-कुलपती डॉ. मंगेश कराड यांनी हा उपक्रम विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील डिजिटल अभियांत्रिकी कौशल्ये प्रदान करणारा महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे सांगितले.




# मतदार यादी पुनरिक्षण की मताधिकारावर गदा?

भारतीय लोकशाहीची भक्कम पायाभरणी ही स्वतंत्र, निष्पक्ष आणि सर्वसमावेशक निवडणूक प्रक्रियेवर उभी आहे. प्रत्येक नागरिकाला समान संधी देणारी आणि पारदर्शकतेच्या तत्त्वांवर चालणारी ही व्यवस्था केवळ कायदेशीर चौकटीत मर्यादित नसून, ती लोकांच्या विश्वासावरही टिकून आहे. मात्र सध्या देशभरात मतदार यादी पुनरिक्षणाच्या प्रक्रियेभोवती निर्माण झालेल्या वादांनी या विश्वासालाच तडा जाऊ लागल्याची चिन्हे दिसत आहेत. 'स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन' ही प्रक्रिया निवडणूक आयोगाकडून मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि विश्वासार्ह करण्यासाठी राबवली जाते. मृत, स्थलांतरित किंवा पुनरावृत्त नावे वगळून पात्र मतदारांचा समावेश करणे हा तिचा मूळ उद्देश आहे. या हेतूमध्ये कोणतीही शंका नाही; उलट, अशी प्रक्रिया लोकशाहीस अधिक सक्षम बनवणारी ठरू शकते. परंतु प्रश्न हा उद्देशाचा नसून, अंमलबजावणीच्या पद्धतीचा आहे. अनेक राज्यांमधून समोर आलेल्या तक्रारींनुसार, 'शुद्धीकरणा'च्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर वैध मतदारांची नावे यादीतून वगळली जात आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिक, स्थलांतरित कामगार, तसेच सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास घटक यांच्यावर या प्रक्रियेचा सर्वाधिक परिणाम होत असल्याचे दिसते. अपुरी माहिती, आवश्यक कागदपत्रांची कमतरता आणि अपील प्रक्रियेतील अडथळे यामुळे अनेकांना आपला मताधिकार टिकवून ठेवणेही कठीण झाले आहे. पश्चिम बंगालसह विविध राज्यांतील आकडेवारी या प्रक्रियेचे व्यापक स्वरूप अधोरेखित करते. लाखो मतदारांची नावे वगळली गेल्याने त्यांच्या मतदानाच्या हक्कावर थेट परिणाम झाला आहे. काही प्रकरणांमध्ये कारण न देता नावे वगळल्याच्या घटना समोर आल्याने प्रशासनाच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. न्यायप्रक्रिया वेळखाऊ आणि गुंतागुंतीची असल्याने, निवडणुकीपूर्वी नाव पुन्हा समाविष्ट करून घेणे अनेकांसाठी अशक्य ठरत आहे. निवडणूक आयोग ही भारतीय संविधानाच्या कलम ३२४ अंतर्गत स्थापन झालेली स्वायत्त संस्था आहे. त्यामुळे तिच्या कार्यपद्धतीवर कोणतीही शंका निमर्ण होणे हे लोकशाहीसाठी चिंताजनक आहे. आयोगाने केवळ निष्पक्ष राहणे पुरेसे नाही, तर तसे भासणेही तितकेच महत्त्वाचे आहे. पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सर्वसमावेशकता ही तत्त्वे काटेकोरपणे पाळली गेली तरच नागरिकांचा विश्वास टिकून राहील. मतदार यादी पुनरिक्षण ही प्रक्रिया निवडणुका अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्यासाठी असते. परंतु जर त्याच प्रक्रियेमुळे नागरिकांचा मतदानाचा हक्क धोक्यात येत असेल, तर त्याचा पुनर्विचार करणे आवश्यक ठरते. लोकशाहीची खरी ताकद ही प्रत्येक मतामध्ये आहे. एकही पात्र मतदार वंचित राहू नये, हीच खरी लोकशाहीची कसोटी आहे. आज गरज आहे ती अधिक संवेदनशील, पारदर्शक आणि लोकाभिमुख दृष्टिकोनाची. अन्यथा 'शुद्धीकरण'च्या नावाखाली लोकशाहीच्या मुळांवरच घाला बसण्याचा धोका नाकारता येणार नाही.

## ९५ टक्के एलपीजी नोंदणी ऑनलाईन; सुरळीत पुरवठ्याचे आश्वासन

नवी दिल्ली : हॅलो प्रभात न्यूज नेटवर्क

देशभरातील एलपीजीचा पुरवठा स्थिर व पुरेसा असल्याची माहिती पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय यांनी दिली आहे. नागरिकांनी भीतीपोटी गॅस साठा करू नये व इंधनाचा जबाबदारीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. एलपीजीच्या उपलब्धतेवर सतत लक्ष ठेवून योग्य नियोजन करण्यात येत असल्याने ग्राहकांना विनाअडथळा सेवा मिळत असल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले. दरम्यान, एलपीजी नोंदणीसाठी डिजिटल माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला असून सुमारे ९५ टक्के ग्राहक आयव्हीआरएस, संदेश सेवा, व्हॉट्सअॅप व मोबाईल अनुप्रयोगांच्या माध्यमातून नोंदणी करत आहेत. गॅस वितरकांकडे होणारी गर्दी टाळण्यासाठी तसेच सेवा अधिक सुरळीत मिळण्यासाठी ग्राहकांनी ऑनलाईन सुविधांचा वापर सुरू ठेवावा, असेही मंत्रालयाने नमूद केले आहे.

## इंद्रियाचे फिनिक्स मार्केटसिटीमध्ये नवे दागिन्यांचे स्टोअर सुरू

पुणे : हॅलो प्रभात



आदित्य बिर्ला समूह यांच्या दागिन्यांच्या 'इंद्रिया' ब्रँडचे पुण्यातील विमाननगर येथील फिनिक्स मार्केटसिटी मध्ये नवे स्टोअर सुरू करण्यात आले आहे. शहरातील हे ब्रँडचे चौथे स्टोअर असून महाराष्ट्रातील उपस्थिती अधिक मजबूत झाली आहे. शहरी ग्राहकांना लक्षात घेऊन उभारलेल्या या स्टोअरमध्ये ३२ हजारांहून अधिक दागिन्यांचे नमुने उपलब्ध आहेत. यामध्ये वधू-अलंकार, सणासुदीचे दागिने तसेच हलक्या वजनाचे दागिने यांचा समावेश आहे. ग्राहकांना दागिन्यांच्या कारीगरीचा अनुभव देण्यासाठी विशेष कारीगरी कक्षाचीही सुविधा देण्यात आली आहे. उच्च दर्जाचा खरेदी अनुभव देण्यावर भर देण्यात आला आहे. या विस्तारामुळे पश्चिम भारतातील ब्रँडची उपस्थिती वाढून प्रीमियम दागिन्यांच्या बाजारपेठेत इंद्रियाची पकड अधिक मजबूत होणार आहे.

# राष्ट्रीय सेवा योजना, माणसं घडवणारी शाळा

दै. हॅलो प्रभात




आज आपण अनेक प्रकारच्या शाळा पाहिल्या. मराठी माध्यम, इंग्रजी माध्यम, उर्दू माध्यम, सेमी इंग्रजी माध्यम, अशा वेगवेगळ्या प्रकारच्या शाळेच्या माध्यमातून विद्यार्थी घडत असतोच परंतु या शाळेबरोबरच महाविद्यालय स्तरावर विद्यार्थी घडवण्याचं काम राष्ट्रीय सेवा योजना करत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्मशताब्दी पासून सुरु करण्यात आली. २४ सप्टेंबर १९६९ पासून राष्ट्रीय सेवा योजना सुरू झाली. पहिल्या वर्षी १९६९ साली ३७ विद्यापीठ व चाळीस हजार विद्यार्थ्यांपासून सुरू झालेली ही योजना संपूर्ण भारतात ३९८७७८१ इतक्या स्वयंसेवकांसह कार्यरत असून महाराष्ट्रात त्याचे ३८७११५ इतके स्वयंसेवक या सेवेशी जोडलेले आहेत. स्थापनेपासून आत्तापर्यंत ७.४ कोटी पेक्षा अधिक स्वयंसेवक राष्ट्रीय सेवा योजनेची जोडलेले आहेत.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांचे जीवन राहणीमान अनुभवता येते. या योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्याला नेतृत्व करण्याची संधी मिळत असते. आपण ज्या समाजात जन्माला आलो त्या समाजाचा आपण काहीतरी देणे लागतो, त्या समाजासाठी काहीतरी केलं पाहिजे. त्या समाजासाठी काहीतरी वेगळे करण्याचे व्यासपीठ राष्ट्रीय सेवा योजने निर्माण करून देते.

राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीद वाक्य Not Me, But You म्हणजेच माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठीच. हे वाक्य लोकशाही जीवनशैलीचा गाभा आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे बोधचिन्ह ओडिसा येथील कोणार्क येथील सूर्य मंदिराच्या रथचक्राच्या आधारावर तयार केलेले आहे. चिन्हाची रचना जीवनाची विकास प्रक्रिया ध्वनीत करते व ते सातत्य व बदलाचे प्रतीक असून राष्ट्रीय सेवा योजना समाज परिवर्तन व उद्धारासाठी सातत्याने प्रयत्नशील राहील. कोणार्क येथील सूर्य मंदिराच्या रथाला २४ चाके आहेत. ते दिवसातील २४ तासांचे प्रतिनिधित्व करतात.

प्रत्येक चाकास ८ आरे आहेत ते दिवसातील ८ प्रहर दर्शवितात. जो कोणी हा बिल्ला लावेल त्याला हा बिल्ला जाणीव करून देतो की दिवसातील २४ तास किंवा ८ प्रहर तो राष्ट्र सेवेसाठी तत्पर आहे. यातील लाल रंग तारुण्य, ज्वलंतपणा उत्साहाचे प्रतीक आहे. निळा रंग हा विश्वाचे प्रतीक आहे आणि या विश्वातील राष्ट्रीय सेवा योजना हा लहान भाग आहे, जो मानवाच्या कल्याणासाठी आपला वाटा उचलण्यात सदैव तत्पर आहे. राष्ट्रीय सेवा योजना भारत सरकारच्या युवा व खेळ मंत्रालय अंतर्गत कार्यरत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे मूळ ध्येय लोकसेवेतून शिक्षण आणि शिक्षणातून लोकसेवा ही आहे. राष्ट्रीय सेवा योजनेत प्रवेश घेण्यासाठी तो विद्यार्थी नियमित विद्यार्थी असावा त्याच्या अंगी समाजासाठी काम करण्याची तळमळ असावी. युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाकरिता त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या विविध पैलूंना फुलवण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना सातत्याने कार्यरत आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आपण अनेक महाविद्यालयीन शिबिरात सहभागी होऊ शकतो.

या शिबिराच्या माध्यमातून श्रमदान, वृक्षारोपण, दत्तक गाव, झोपडपट्टी दत्तक योजना. स्वच्छता अभियान, पाणंद रस्ते बांधणी, साक्षरता अभियान, जनजागृती, पाणी आडवा, पाणी जिरवा, रक्तदान, ग्रामसंवाद, पथनाट्य पर्यावरण संरक्षण, आपत्कालीन किंवा नैसर्गिक आपत्तीच्या वेळी पीडित लोकांना मदत अशा अनेक उपक्रमात आपण सहभागी होऊ शकतो.

तसेच राज्यपाल कार्यालय आयोजित आव्हान राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर, उत्कर्ष, प्रेरणा यासारख्या राज्यस्तरीय तर राष्ट्रीय एकात्मता शिबिर, आर.डी परेड, राष्ट्रीय साहसी शिबिर यासारख्या राष्ट्रीय शिबिरात आपण सहभागी होऊ शकतो. योजनेच्या माध्यमातून उत्कृष्टकाम केलेल्या स्वयंसेवकाला जिल्हास्तरीय, विद्यापीठस्तरीय राज्यस्तरीय, राष्ट्रीयस्तरीय अशा वेगवेगळ्या स्तरावरील पुरस्कारांनी सन्मानित केले जाते. राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या कार्यक्रम आधिकारी, एन एस एस युनिट, विद्यापीठ यांना सुद्धा राज्य व राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित केले जाते.

विद्यार्थ्याला स्वतःची ओळख निर्माण करून देत असते. एकदा का कोणताही स्वयंसेवक विद्यार्थी या योजनेत सहभागी झाला ही तो आयुष्यभर या योजनेशी नकळतपणे जोडला जातो आणि आयुष्यभर मी एन.एस.एस.चा स्वयंसेवक आहे हे अभिमानाने सांगतो. राष्ट्रीय सेवा योजना खऱ्या अर्थाने चांगल्या आचारांची, विचारांची आणि संस्कारांची पिढी घडविण्याचे काम करत असते, खऱ्या अर्थाने ती एक चांगला माणूस घडवण्याची ती एक शाळाच असते.



• अजित शिवाजी पोवार
उत्कृष्ट स्वयंसेवक : राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार
जिल्हा व राज्य युवा पुरस्कारार्थी, महाराष्ट्र शासन

## स्थलांतरित कामगारांसाठी ५ किलो गॅस सिलिंडरचा पुरवठा दुप्पट

नवी दिल्ली : हॅलो प्रभात न्यूज नेटवर्क

पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय यांनी स्थलांतरित कामगार व गरजू नागरिकांसाठी स्वयंपाकाचा गॅस सहज उपलब्ध व्हावा यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार ५ किलो क्षमतेच्या छोट्या गॅस सिलिंडरच्या उपलब्धतेत मोठी वाढ करण्यात आली असून दैनंदिन पुरवठा दुप्पट करण्यात आला आहे. तसेच ७ एप्रिलपासून सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांवरील पुरवठा निर्बंधही हटविण्यात आले आहेत. मार्च महिन्यात वाढलेल्या मागणीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला असून, यामुळे शहरी व निमशहरी भागातील गॅस टंचाई कमी होण्यास मदत होणार आहे. नागरिकांना स्वस्त दरात गॅस उपलब्ध होणार असल्याचे मंत्रालयाने सांगितले.

## कस्तुरबाई वालचंद कॉलेजच्या शुभमची एन.डी.ए.मध्ये निवड

सांगली : हॅलो प्रभात



श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय येथील एनसीसी कॅडेट शुभम सुरेश कोळेकर यांची राष्ट्रीय संरक्षण अकादमी येथे निवड झाली आहे. त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवत ही कामगिरी साध्य केली.

खडकवासला (पुणे) येथील राष्ट्रीय संरक्षण अकादमीच्या १५६ व्या तुकडीसाठी त्यांची निवड झाली असून यानिमित्त लठ्ठे एज्युकेशन सोसायटी तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष शांतिनाथ कांते, उपाध्यक्ष चंद्रकांत पाटील, मानद सचिव सुहास पाटील, खजिनदार भालचंद्र पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

तसेच प्राचार्य डॉ. बी. पी. लाडगावकर, उपप्राचार्य डॉ. पी. एन. गोरे, डॉ. पी. एन. चौगुले व एनसीसी विभाग प्रमुख डॉ. सुभाष पाटील उपस्थित होते.

## 'जननी आरोग्य शिबिरा'चे पुण्यात उद्घाटन

पुणे : हॅलो प्रभात

मॅटकेअर मॅटर्निटी अँड चाइल्ड हॉस्पिटल तर्फे पहिल्या वर्धापनदिनानिमित्त विमाननगर येथील सिम्बायोसिस ऑडिटोरियम येथे 'जननी आरोग्य शिबिरा'चे उद्घाटन करण्यात आले.

महिला व गर्भवती मातांना वेळेवर तज्ज्ञ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असून, पुणे ओबीजिवाय सोसायटी, एनएमओ आणि रोटरी क्लब यांचे सहकार्य लाभले आहे.

उद्घाटन केंद्रीय मंत्री मनसुख मांडविया यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी प्रसूतीपूर्व मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन केले तसेच पुणे व परिसरात १०० प्रसूतीपूर्व शिबिरांच्या जाळ्याचा शुभारंभ केला.

## ए टू झेड डेली मल्टीव्हिटॅमिन सप्लिमेंट लाँच

मुंबई : हॅलो प्रभात




अल्केम लॅबोरेटरीज लि. (बीएसई: ५३९५२३, एनएमई: अल्केम, 'अल्केम' आणि तिच्या उपकंपनी) ने प्रौढांकरिता शरीर आणि मनाला सर्वांगीण पोषण देण्यासाठी दररोज घेता येणारे मल्टीव्हिटॅमिन सप्लिमेंट 'ए टू झेड डेली'च्या लाँचची घोषणा केली. ए टू झेड डेली टॅब्लेट्स संतुलित पोषण देण्यासाठी एकूण २६ अत्यावश्यक व्हिटॅमिन्स, खनिजे आणि वनस्पती अर्कांसह तयार करण्यात आल्या आहेत. यातील मुख्य व्हिटॅमिन्स आणि मिनरल्समध्ये व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स, व्हिटॅमिन डी३, व्हिटॅमिन सी, झिंक आणि लोह यांचा समावेश आहे.

## प्रा.हर्षल वांगीकर यांना पीएच.डी

सांगली : हॅलो प्रभात



डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय येथील प्राध्यापक प्रा. हर्षल वांगीकर यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक लौकिकात भर पडली आहे. प्रा. वांगीकर यांनी रायगड जिल्ह्यातील सागरी परिसंक्रमण क्षेत्रातील निवडक ब्रायोफायट्सवर संशोधन पूर्ण केले असून त्यांच्या प्रबंधात सखोल अभ्यास व नाविन्यपूर्ण निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

# जालियनवाला बाग हत्याकांड...

हॅलो प्रभात

पंजाबमधील अमृतसर येथील जालियनवाला बाग येथे १३ एप्रिल १९१९ मध्ये मोठी सभा सुरू होती. जालियनवाला बागमध्ये १५ ते २० हजार माणसं जमली होती. मार्च महिन्यात ब्रिटिश सरकारने मंजूर केलेल्या रॉलेट कायद्याचा निषेध करणाऱ्या सत्यपाल आणि सैफुद्दीन किचलू यांना अटक करण्यात आली. तर आंदोलकांवर गोळ्याही चालवण्यात आल्या होत्या. यावेळी इंग्रजांच्या छोट्या तुकडीचं नेतृत्व जनरल डायरने केलं होतं. पण या हत्याकांडाचा आदेश पंजाबचे तत्कालीन गव्हर्नर मायकल ओडरवायर यांनी दिला.


१३ एप्रिल १९१९ ला हत्याकांड झाले त्यावेळी भारतीय स्वातंत्र्य सैनिक उधमसिंह यांचं वय होतं फक्त ४ वर्षांचं. पण तो दिवस त्यांच्या कायमचा लक्षात राहिला. या घटनेचा बदला घेण्यासाठी त्यांनी तब्बल २१ वर्षं वाट पाहिली आणि १३ मार्च १९४० रोजी ओडरवायर यांची लंडनमध्ये हत्या करून जालियनवाला बाग हत्याकांडाचा बदला घेतला.

### काय झालं होतं जालियनवालामध्ये?

रौलट कायद्याचा शांतपणे निषेध करण्यासाठीच हा मोठा जनसमुदाय जालियनवाला बागेत जमलेला होता. अचानक आकाशातून लोकांना घरघर ऐकू आली. अनेकांनी यापूर्वी आयुष्यात कधीही विमान पाहिलेलं नव्हतं आणि हे विमान तर फारच खालून उडत होतं. जनरल डायरच्या आदेशानंतर सलग दहा मिनिटं सुरु होता गोळीबार... भारतात 'पाकिस्तान' बनवण्याचा डाव असा उधळला गेला होता. काहींना काहीतरी वेगळं घडत असल्याचा संशय आला आणि त्यांनी तिथून काढता पाय घेतला. अचानक मागून बुटांचा आवाज आला आणि जालियनवाला बागेच्या बोळवजा रस्त्याने ५० सैनिक दाखल झाले.

### २५ गुरखा सैनिक आणि २५ बलूच सैनिक

सैनिकांची एक फळी बसली होती. दुसरी उभी होती. सैनिकांनी पोझिशन घेतली आणि एकही सेकंद न गमावता जनरल डायरने आदेश दिला... फायर... त्याबरोबर कोणतीही पूर्वसूचना न देता गोळाबार सुरू झाला. चहूबाजूंनी बंदिस्त जालियनवाला बागेत अडकलेल्या लोकांवर पुढची दहा मिनिटं बुलेट्सचा वर्षाव होत होता. सैनिक नेम धरून लोकांना टिपत होते. बंदूक रिकामी झाली तर ती 'री-लोड' करण्याचे आणि गर्दी असेल तिथे गोळीबार करण्याचे जनरल डायरचे आदेश होते. लोकं घाबरून सैरावैरा पळू लागली, पण बाहेर पडायचा एकच मार्ग होता आणि तो ब्रिटिश सैन्याने रोखलेला होता.



अनेकांनी भिंत ओलांडून जाण्याचा प्रयत्न केला, पण सैनिकांच्या गोळ्यांनी त्यांचा अचूक वेध घेतला. हळूहळू मृतदेहांचा खच पडत होता. गोळ्यांपासून जीव वाचवण्यासाठी अनेकांनी स्वतःला जमिनीवर झोकून दिलं, पण त्यांनाही सोडण्यात आलं नाही. सैनिकांच्या गोळ्यांनी लहान - मोठे, स्त्री-पुरुष सगळ्यांचाच वेध घेतला. जनरल डायरच्या अगदी शेजारीच उभ्या असणाऱ्या सार्जंट अँडरसनने नंतर हंटर कमिटीला सांगितलं, गोळीबार सुरू झाला तेव्हा सुरुवातीला सगळ्यांनीच जमिनीवर लोटांगण घातलं. मग आम्ही काही लोकांना भिंतीवर चढण्याचा प्रयत्न करताना पाहिलं. स्वतःचा जीव वाचवण्यासाठी अनेकांनी जालियनवाला बागेत असणाऱ्या विहीरीत उड्या मारल्या. अमेरिकेतल्या भारताच्या राजदूत राहिलेल्या नवतेज सारना यांनी जालियनवाला बाग घटनेच्या अभ्यास केला असून याविषयी पुस्तकही लिहिलं आहे. ते म्हणतात, एके ठिकाणी असा उल्लेख आहे की डायर यांचा सहकारी ब्रिग्सने एका क्षणी त्यांना कोपराशी धरून खूण केली - आता बास्स झालं. पण जनरल डायरने त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं. तिथेच हजर असणाऱ्या एस. पी. रिहेल यांनी हंटर समितीसमोर साक्ष देताना म्हटलं होतं की, लोकांची पळापळ झाल्याने हवेत धूळ उडाली होती आणि सगळीकडे रक्तच रक्त सांडलं होतं. दहा मिनिटांच्या या गोळीबारादरम्यान डायरच्या सैनिकांनी गोळ्यांचे एकूण १६५० राउंड्स झाडले.

बीबीसीशी बोलताना त्यांनी सांगितलं होतं, मी त्या दिवशी माझ्या आजोबांसोबत जालियनवाला बागेत गेलो होतो. गोळीबार सुरू झाल्यावर आजोबांनी मला उचललं आणि सैनिकांपासून दूर, दुसऱ्या दिशेच्या भिंतीकडे पळायला लागले. बाहेर पडायला रस्ता नसल्याचं लक्षात आल्यानंतर त्यांनी मला सात फुटी भिंतीवरून दुसऱ्या बाजूला फेकलं. उंचावरून खाली पडल्याने माझा हात मोडला, पण ही कहाणी सांगायला




मी जिवंत राहिलो. त्रास होत असूनही अनेक दिवस आम्ही हॉस्पिटलमध्ये गेलो नाही. कारण आम्हाला भीती वाटत होती. गोळीबार थांबला आणि ज्या वेगाने सैनिक आले होते, त्याच वेगाने बाहेर निघून गेले.

या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या हंटर समितीसमोर जनरल डायरने नंतर सांगितलं होतं की, लोकांच्या किंकाळ्या आणि आक्रोश इतका होता की गोळीबार थांबवण्यातही अडचणी आल्या. कारण डायर देत असलेल्या सूचना सैनिकांना ऐकूच जात नव्हत्या. जालियनवाला बागेतून बाहेर पडून जनरल डायर आपल्या गाडीत बसून निघून गेला तर सैनिक मार्च करत गेले. जालियनवाला बागेत विव्हळत पडलेल्यांना त्या रात्री कोणतीही मदत मिळाली नाही. अशातच जनरल डायरने संध्याकाळी संपूर्ण अमृतसर शहराचा वीज आणि पाणी पुरवठा बंद केला. लोकांना घराबाहेर पडायला मनाई करण्यात आली. म्हणून मग जखमी झालेल्या नातेवाईकांना बाहेर आणणं वा मृतांना घरी आणणंही लोकांना शक्य झालं नाही. रात्री १० वाजता जनरल डायरने पुन्हा एकदा शहरात फेरी मारत परिस्थितीचा आढावा घेतला. ब्रिटिश राजवटीने सुरुवातीला या नरसंहाराची दखल घेतली नाही. पण नंतर याविषयीच्या बातम्या पसरू लागल्या आणि त्यांना या प्रकरणाची दखल घ्यावी लागली. जालियनवाला बाग हत्याकांड या प्रकरणाचा तपास करण्यासाठी ब्रिटिश सरकारने हंटर समितीची स्थापना केली. या समितीने डायरचं कृत्य चुकीचं ठरवलं. ब्रिटीश सरकारने जनरल डायरला राजीनामा द्यायला सांगितलं. लंडनमधला ब्रिटिश संसदेत हाऊस ऑफ कॉमन्समध्ये यावर खडाजंगी झाली आणि डायरचं कृत्य चुकीचं असल्याचं तिथेही म्हटलं गेलं. पण हाऊस ऑफ लॉर्ड्सने डायरच्या बाजूने भूमिका घेतली. ब्रिटीश सरकार डायरवर अन्याय करत असल्याचं इथे म्हटलं गेलं. घटनेच्या रात्री जनरल डायरने तेव्हाचे पंजाबचे लेफ्टनंट गव्हर्नर ओडरवायर यांना पाठवलेल्या अहवालात २०० लोक मारले गेल्याचं म्हटलं होतं. पण या गोळीबारात एकूण ३७९ लोक मारले गेल्याचं हंटर समितीने म्हटलं. यामध्ये ४१ लहान मुलं होती. पण खरी परिस्थिती अशी होती की, इथे प्रत्यक्षात १००० जण मारले गेल्याचं म्हटलं जातं. तर ४ ते ५ हजार जण जखमी जालेले होते. नंतर अनेक जखमींचा घरी गेल्यावर काही काळाने मृत्यू झाला. या घटनेच्या निषेधार्थ महात्मा गांधींनी आपले सगळे पुरस्कार परत केले तर व्हॉईसरॉय चेम्सफर्ड यांना पत्र लिहीत गुरुदेव रविंद्रनाथ टागोर यांनीही 'नाईटहुड' (Knighthood) परत करत असल्याचं कळवलं.

### जनरल डायर विषयी...

जनरल डायरचा जन्म भारतातच झाला होता. त्याचे वडील दारू निर्मितीचं काम करत. डायरला ऊर्दू व हिंदी या दोन्ही भाषा व्यवस्थित येत होत्या. आपण लोकांवर गोळीबार करण्यासाठी मशीनगनचा वापर केला आणि बागेतून बाहेर पडण्याचा लहानसा रस्ता रोखला, हे नंतर डायरने हंटर कमिशनसमोर मान्य केलं. जिथे जास्त लोकं असतील तिथे गोळीबार करण्याचे आदेश दिल्याचंही डायरने मान्य केलं. गोळीबार बंद झाल्यानंतर जखमींना रुग्णालयात नेण्याची किंवा मृतांवर अंत्यसंस्कार करण्याची सोय न करण्यात आल्याचंही डायरने सांगितलं. जनरल डायरकडे 'ब्रिटिश साम्राज्याचा उद्धारक' म्हणून पाहण्यात आलं. जनरल डायरचा इंग्लंडमध्ये मृत्यू झाल्यानंतर शासकीय इतमामात त्याचं दफन करण्यात आलं.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक हॅलो प्रभात हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली – ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक हॅलो प्रभात, कार्यालय, स.न.१४/१५/२/३, फ्लॅट नं.२०, शिवपुष्प, ए पार्क, वडगाव बु., पुणे- ४११०४१. (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ पुणे कार्यालय : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३० ■ पुणे संपर्क : ८५५१०५५११३
■ कोल्हापूर कार्यालय : एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ सांगली मुख्य कार्यालय : कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ संपादक : संजीव शाळगावकर

हॅलो प्रभात

MY CITY

पुणे-सांगली ३

सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६

## दादांचे मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न सुनेत्रा ताई पूर्ण करणार : तटकरे

**पुणे : हॅलो प्रभात :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांचे कार्य आणि स्वप्नांची आठवण करून देत राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी भावनिक आवाहन केले. "अजितदादा हे केवळ व्यक्ती नसून एक विचार आहेत. त्यांनी पाहिलेली स्वप्ने साकारली; आता त्यांना मुख्यमंत्री म्हणून पाहण्याची वेळ आली होती. ते स्वप्न भविष्यात सुनेत्रा पवार यांच्या माध्यमातून पूर्ण व्हावे," असे त्यांनी म्हटले. बारामती येथे आयोजित प्रचार सभेत त्या बोलत होत्या. यावेळी दादांच्या कार्याचा आढावा घेताना तटकरे भावूक झाल्या. "जसे आपण आषाढी एकादशीला वारीला जातो, तसे कोणत्याही लोकप्रतिनिधीसाठी बारामती ही विकासाची पंढरी आहे. या मतदारसंघात दादांनी अनेक स्वप्ने पाहिली आणि ती पूर्ण केली," असे त्या म्हणाल्या. निवडणूक काळातील आठवणी सांगताना त्यांनी नमूद केले की, अजित पवार हे नेहमी मारुतीरायाचे दर्शन घेऊनच प्रचाराची सुरुवात करत. अर्ज दाखल करण्यापासून ते समारोप सभेपर्यंत बारामतीतच त्यांचा उत्साह कायम असायचा. "दादांनंतर सुनेत्रा पवार यांनी सर्व काही बाजूला ठेवून उभे राहणे, हे बारामतीकर कधीही विसरणार नाहीत. आम्हा सर्व कार्यकर्त्यांची इच्छा होती की, दादांना मुख्यमंत्री म्हणून पाहावे; मात्र तसे होऊ शकले नाही, ही खंत आहे," असे सांगताना तटकरे यांचा कंठ दाटला.

## थोडक्यात पण महत्वाचे

### 'मनमंदिर' पतसंस्थेला २ कोटी ६१ लाखांचा नफा

**विटा : हॅलो प्रभात**



■ संस्थेची आर्थिक स्थिती भक्कम

■ अध्यक्ष गायकवाड यांची माहिती

मनमंदिर पतसंस्थेने आर्थिक वर्षात २ कोटी ६१ लाख रुपयांचा नफा मिळवला असून संस्थेची आर्थिक स्थिती मजबूत आणि स्थिर असल्याचा दावा संस्थेचे अध्यक्ष गायकवाड यांनी केला आहे.पुढे श्री. गायकवाड म्हणाले, संस्थेचा पाया भक्कम असून सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे आणि सोलापूर जिल्ह्यांत संस्थेचे कार्यक्षेत्र विस्तारलेले आहे. सध्या संस्थेच्या सर्व १४ शाखा संगणकीकृत असून सी.बी.एस. प्रणालीद्वारे ग्राहकांना कोणत्याही शाखेतून सेवा उपलब्ध करुन दिली जात आहे. विशेष म्हणजे संस्थेच्या सर्व शाखा सध्या नफ्यात असून लवकरच सलगरे, रहिमतपूर आणि कडेगाव येथे नवीन शाखा कायान्वित होणार आहेत. संस्थेचे वसूल भागभांडवल ५ कोटी ७६ लाख असून निधी ८ कोटीच्या घरात आहे. संस्थेकडे एकूण १४९ कोटी ५९ लाखांच्या ठेवी असून १०३ कोटी ८८ लाखांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. तसेच संस्थेची गुंतवणूक ४३ कोटी ५४ लाख इतकी असून संस्थेने एकूण २४३ कोटी ४८ लाखांच्या व्यवसायाचा टप्पा यशस्वीपणे पार केला आहे. संस्था आस्टीजीएस, एनईएफटी, मोबाईल बौकग व पिग्मी कलेक्शन सेवा ग्राहकांना देत आहे. यावेळी उपाध्यक्ष अजित गायकवाड, चंद्रशेखर यादव, शशिकांत तारळेकर यांच्यासह सर्व संचालक उपस्थित होते.



### वन्यप्राण्यांच्या हल्ल्याने शेतकऱ्यांचे पिकांचे नुकसान

**देवराष्ट्रे : हॅलो प्रभात**

■ चिंचणीतील आक्रोशानंतर वनमंत्री गणेश नाईक ॲक्शन मोडवर

■ तात्काळ पंचनामा व नुकसानभरपाईचे कडक आदेश

कडेगाव तालुक्यातील चिंचणी (अंबक) परिसरात वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याने ग्रामस्थांचा संताप उफाळून आला आहे. उसासह इतर पिकांचे वारंवार होणारे नुकसान, रात्रीच्या वेळी गवा, हरण, काळवीट यांचा वाढता वावर यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.या पार्श्वभूमीवर चिंचणी येथील शेतकऱ्यांनी थेट मुंबईत जनता दरबार गाठत वनमंत्री गणेश नाईक यांच्यासमोर आपली व्यथा मांडली. डोंगराळ व जंगलालगतच्या भागात वन्यप्राण्यांकडून होणाऱ्या हल्ल्यांमुळे शेतकऱ्यांचे पिकांचे मोठे नुकसान होत असल्याचे ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे स्पष्ट केले.ग्रामस्थांनी सोलर फेन्सिंग, संरक्षक कुंपण, नियमित वन विभागाची गस्त तसेच तात्काळ नुकसानभरपाई यांची मागणी केली. शेतकऱ्यांच्या आक्रोशाची गंभीर दखल घेत मंत्री गणेश नाईक यांनी तातडीने अधिकाऱ्यांना फोनवरून कडक निर्देश दिले. तात्काळ पंचनामा करा, शेतकऱ्यांना विलंब न करता नुकसानभरपाई द्या. सहा-सहा महिने फाईल अडकवणे खपवून घेतले जाणार नाही," असे स्पष्ट आदेश त्यांनी दिल्याचे समजते. तसेच सोलर फेन्सिंग, गस्त आणि कायमस्वरूपी उपाययोजना तातडीने सुरू करण्याचे निर्देशही देण्यात आले. या तात्काळ हस्तक्षेपामुळे ग्रामस्थांना काहीसा दिलासा मिळाला असून गावात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी सरपंच ॲड. रमेश मदने, प्राचार्य प्रताप महाडिक, माजी उपसरपंच दत्तात्रय माने, सोमनाथ जाधव, उदयसिंह पाटील यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

### साताऱ्यात अतिक्रमणाविरुद्ध पालिकेचा बडगा

**सातारा : हॅलो प्रभात**



शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या तयारीसाठी सातारा पालिकेने अतिक्रमणांविरोधात जोरदार कारवाई सुरू केली आहे. छत्रपती शाहू महाराज चौक ते बगाडे हॉस्पिटल या मार्गावरील टपऱ्या हटवून रस्ता मोकळा करण्यात आला. रविवारी सकाळी पार पडलेल्या या मोहिमेत अतिक्रमण विभागाने सुमारे आठ ते दहा टपऱ्यांवर कारवाई केली. अतिक्रमण निरीक्षक प्रशांत निकम यांच्या नेतृत्वाखाली १५ कर्मचाऱ्यांच्या पथकाने ही कारवाई केली. अचानक झालेल्या या कारवाईमुळे परिसरात काही काळ गडबड उडाली. १४ एप्रिल रोजी होणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विशेषतः भिमाई स्मारक समितीच्या वतीने होणाऱ्या 'भिमाई महोत्सवा'च्या पार्श्वभूमीवर शहरातील मुख्य रस्ते मोकळे ठेवण्यावर प्रशासनाचा भर आहे. नगराध्यक्ष अमोल मोहिते यांच्या सूचनेनुसार आणि मुख्याधिकारी विनोद जळक यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. वाहतुकीची कोंडी टाळणे, अपघातांचा धोका कमी करणे आणि पादचाऱ्यांना मोकळा पदपथ उपलब्ध करून देणे, हा या कारवाईमागील मुख्य उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. दरम्यान, शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि पदपथ अतिक्रमणांच्या विळख्यात अडकत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन आगामी काळातही अतिक्रमण हटाव मोहिमा अधिक तीव्र केल्या जाणार असल्याचे अतिक्रमण विभागाकडून सांगण्यात आले.

# 'महसूल समाधान शिबिरा'ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### शेकडो दाखल्यांचे जागेवरच वाटप

**रायगड : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र शासनाच्या "छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर" अभियानांतर्गत कळंब येथे आयोजित विशेष शिबिराला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. महसूल मंडळ कळंब व तहसीलदार कार्यालय कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने प्रगती माध्यमिक विद्यालय, कळंब येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत झालेल्या या शिबिरात शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांनी आपली प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी मोठी गर्दी केली होती. एकाच छताखाली विविध शासकीय सेवा उपलब्ध झाल्याने नागरिकांची धावपळ थांबली आणि वेळ व पैशांचीही बचत झाली

या शिबिरात महसूल विभागाने अत्यंत वेगाने कामकाज करत खालीलप्रमाणे दाखले व सेवांचे वाटप केले:

यामध्ये उत्पन्नाचे दाखले - २७६,
जात प्रमाणपत्रे - १०८, अधिवास (रहिवासी) प्रमाणपत्रे - ९६
आधार नोंदणी व दुरुस्ती - १२ प्रकरणे
पीएम किसान योजना नोंदणी - २३, भूमी अभिलेख (आकारफोड पत्र) - १



याव्यतिरिक्त नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्रे, संजय गांधी निराधार योजनेचे लाभ, नवीन शिधापत्रिका, ७/१२ उतारे, नकाशे आणि जमीन फेरफार नोंदी यांसारखी कामेही तात्काळ मार्गी लावण्यात आली.

कर्जतचे तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर यशस्वी झाले. यावेळी कळंब मंडळ अधिकारी संतोष जांभळे, ग्राम महसूल अधिकारी विकास मिरगणे, निलेश पवार, दर्शना कांबळे, मोहिनी भडांगे, आकाश निकाळे यांच्यासह महसूल कर्मचारी, कोतवाल व पोलीस पाटील यांनी प्रत्यक्ष मैदानात उतरून नागरिकांना सहकार्य केले.

या उपक्रमासाठी प्रगती माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाष देशमुख आणि कळंब आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय पथकाचेही विशेष सहकार्य लाभले. शासकीय योजना आणि प्रमाणपत्रे थेट दारी मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, प्रशासनाच्या या गतिमान कामाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे.

# आयव्ही इस्टेटच्या रस्ता कामाला वेग

## दिलेला शब्द पाळणार ; नगरसेविका रत्नमाला सातव

**वाघोली : हॅलो प्रभात**

आयव्ही इस्टेट परिसरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याच्या प्रश्नावर आता प्रशासनाने ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. लेक्सिकन स्कूल- म्हसोबा मंदिर-केसनंद रोड या महत्त्वाच्या रस्त्याचे काम लवकर सुरू करण्यासाठी स्थायी समितीत पाठपुरावा करण्यात आल्यानंतर प्रत्यक्ष हालचाली सुरू झाल्या आहेत. यासंदर्भात पथ विभागाचे मुख्य अभियंता राजेश बनकर, कार्यकारी अभियंता धाराव तसेच कनिष्ठ अभियंता सुशील मोहिते यांनी संबंधित ठिकाणी भेट देत प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी रस्त्याची सध्यस्थिती, तांत्रिक



बाबी आणि कामाच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. दरम्यान, या प्रकल्पासाठी सुमारे ९ कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीची मागणी करण्यात आली असून, लवकरच निधी मंजूर होऊन कामाला गती मिळण्याची शक्यता आहे. यापूर्वीही नगरसेविका रत्नमाला सातव यांनी स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भीमाले आणि आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे लेखी पाठपुरावा करून निधीची मागणी केली होती. याबाबत बोलताना नगरसेविका रत्नमाला सातव म्हणाल्या, आयव्ही इस्टेट परिसरातील रस्त्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. निवडणुकीवेळी नागरिकांना दिलेला शब्द पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आवश्यक निधी मंजूर करून लवकरच काम सुरू केले जाईल आणि नागरिकांना दर्जेदार रस्त्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस संदिप (आबा) सातव, नगरसेवक रामभाऊ दाभाडे, माजी उपसरपंच महेंद्र भाडळे तसेच वाघोली परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यशवंत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी सरोज पाटील-रायनाडे

**कुपवाड : हॅलो प्रभात**



■ सचिवपदी प्रा. एस.ए.पाटील यांची निवड

थोर देशभक्त व स्वातंत्र्यसैनिक कै.आर.पी.पाटील (आण्णा) यांनी 1960 साली कुपवाड येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रेरणेने स्थापन केलेल्या यशवंत शिक्षण संस्थेच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे. संस्थेच्या चेअरमनपदी दिवंगत प्रा. शरद पाटील यांच्या कन्या ॲड. सरोज जीतेन पाटील-रायनाडे यांची तर सचिवपदी माजी प्राचार्य प्रा. एस.ए. पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली. संस्थेच्या कार्यकारी व शासक समितीच्या बैठकीत ही निवड जाहीर करण्यात आली. यावेळी संस्थापक कै. आर. पी. पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच नूतन पदाधिकाऱ्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. नूतन चेअरमन ॲड. सरोज पाटील-रायनाडे यांनी संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# भिमनगरमध्ये महात्मा जोतिराव फुले यांची जयंती उत्साहात

**पुणे : हॅलो प्रभात**

भिमनगर येथे महात्मा जोतिराव फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी 'प्रतिष्ठान'चे संस्थापक जितेंद्र कराळेकर यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना जितेंद्र कराळेकर म्हणाले की, "महात्मा फुले यांचे मूळ आडनाव गोऱ्हे होते, मात्र पुण्यातील फुलांच्या व्यवसायामुळे त्यांना 'फुले' हे नाव मिळाले. समाजसुधारक म्हणून त्यांच्या अतुलनीय कार्यामुळे जनतेनेच त्यांना 'महात्मा' ही पदवी बहाल केली."



स्त्री शिक्षणाचे महत्त्व विषद करताना त्यांनी सांगितले की, १८४८ मध्ये भिडे वाड्यावर मुलींची पहिली शाळा सुरू करून महात्मा फुले यांनी क्रांती घडवली. त्यांनी प्रथम सावित्रीबाई फुले यांना शिक्षित केले. आज स्त्रिया राष्ट्रपती, पंतप्रधान, डॉक्टर आणि जिल्हाधिकारी यांसारख्या उच्च पदांवर कार्यरत आहेत, याचे संपूर्ण श्रेय महात्मा फुले यांनी पेरलेल्या शिक्षणरूपी बीजाला जाते. तसेच, छत्रपती शिवाजी महाराज यांची समाधी शोधून त्यांची पहिली जयंती साजरी करण्याचा मानही महात्मा फुले यांनाच जातो, असेही त्यांनी नमूद केले.

# अतिक्रमणमुक्त शेतरस्त्यांमुळे शेतकऱ्यांना दिलासा

## ३८ रस्ते खुले, ६५ची मोजणी पूर्ण : शेतकऱ्यांचा आनंद गगनात मावेना

**शिरूर : हॅलो प्रभात**

बबन वाघमारे

तालुक्यातील अतिक्रमणग्रस्त शिव व पानंद शेतरस्त्यांच्या प्रश्नावर सुरू असलेल्या चळवळीला मोठे यश मिळाले असून, एकूण ११७ रस्त्यांपैकी तब्बल ३८ रस्ते खुले करण्यात प्रशासनाला यश आले आहे, तर ६५ रस्त्यांची मोजणी पूर्ण झाली आहे. शिव पानंद शेतरस्ता चळवळीचे संस्थापक अध्यक्ष शरद पवळे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.



या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, पूर्वी चिखलातून व अडथळ्यांतून शेतमाल वाहतूक करणाऱ्या शेतकऱ्यांना आता थेट रस्त्याची सुविधा उपलब्ध होत आहे. त्यामुळे शेतीसाठी लागणारी साधनसामग्री ने-आण, विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास तसेच ग्रामीण भागातील दैनंदिन जीवन अधिक सुलभ होत असल्याचे चित्र आहे. शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून अनेकांनी आनंद व्यक्त केला आहे. या चळवळीला मुंबईतील आझाद मैदान येथील आंदोलनामुळे गती मिळाली. शासनाने सकारात्मक भूमिका घेत अर्जानंतर ९० दिवसांत रस्ता खुला करण्याचे आदेश दिले. तसेच मोजणी व पोलीस बंदोबस्त शुल्क माफ करत 'मुख्यमंत्री बळीराजा योजना' अंतर्गत रस्त्यांच्या विकासाला चालना देण्यात आली.

प्रशासनाच्या एकत्रित प्रयत्नांतून आतापर्यंत १६३८ शेती गटांची मोजणी पूर्ण झाली असून सुमारे १६१ किलोमीटर लांबीचे रस्ते मोकळे करण्यात आले आहेत. याशिवाय ४८ रस्त्यांची सातबारा नोंद करण्यात आली आहे, ज्यामुळे या प्रक्रियेला अधिकृत स्वरूप प्राप्त झाले आहे. दरम्यान, अतिक्रमण हटविण्यास अडथळा आणणाऱ्यांवर आयपीसी कलम ३५३ व १८८ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात येत असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांचे आधारकार्ड व फार्मर आयडी पाच वर्षांसाठी बंद करण्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच भविष्यात रस्त्यांच्या कडेला दगडी क्रमांक चिन्हे बसवून स्पष्ट सीमांकन करण्यात येणार असून 'झिरो पेंडन्सी'चा पाठपुरावा केला जाणार आहे. या मोहिमेमुळे राज्यातील हजारो शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी आवश्यक असलेले रस्ते मोकळे होण्याचा मार्ग सुकर झाला असून ग्रामीण भागातील शेती विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त होत आहे.

# कुंभारी दुर्घटनेची विक्रमसिंह सावंत यांच्याकडून पाहणी

### नुकसानभरपाईची केली मागणी

**जत : हॅलो प्रभात**

अमोल कुलकर्णी

कुंभारी (ता.जत) येथील गावालगत असलेला पाझर तलाव अचानक फुटल्याने परिसरात भीषण परिस्थिती निर्माण झाली असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. प्राथमिक माहितीनुसार, तलावाच्या बांधामध्ये घूस व सायाळ यांनी केलेल्या छिद्रांमुळे बांध कमकुवत झाला होता. यामुळेच तलावाचा बांध अचानक फुटल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

तलाव फुटल्यानंतर प्रचंड वेगाने पाणी शेतांमध्ये घुसले. या वेगवान पाण्याच्या प्रवाहामुळे शेतातील ऊस, मका तसेच विविध बागायती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. इतकेच नव्हे तर अनेक शेतांतील सुपीक माती वाहून गेल्याने शेतीची उर्वरित क्षमता देखील मोठ्या प्रमाणावर कमी झाली आहे. काही ठिकाणी तर पिकांसह जमिनीची वरची थरच वाहून गेल्याचे चित्र दिसून येत आहे. या दुर्घटनेत अंदाजे ६० ते ७० हेक्टर क्षेत्रातील शेती बाधित झाली असून जवळपास ३० विहिरी गाळाने भरल्या आहेत. त्यामुळे पाण्याचे स्रोतही नष्ट झाले आहेत. भविष्यातील शेतीसाठीही गंभीर अडचणी निर्माण झाल्या आहेत. शेतकऱ्यांच्या आयुष्यभराच्या



मेहनतीवर पाणी फिरले असून त्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. घटनेची माहिती मिळताच माजी आमदार मा. विक्रमसिंह सावंत यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली व बाधित शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना धीर दिला. यावेळी त्यांनी प्रशासनाशी चर्चा करून तातडीने पंचनामे करण्याचे व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य व त्वरित नुकसानभरपाई देण्याचे निर्देश देण्याची मागणी केली. यावेळी मा.आ.विक्रमसिंह सावंत यांच्या सोबत मा.नानासाहेब सूर्यवंशी ,मा.प्रभाकर जाधव,मा. सरपंच कृष्णा जाधव,मा. उपसरपंच अजित सूर्यवंशी,मा. काकासो शिंदे,मा.महादेव सूर्यवंशी ,भानुदास जाधव ,मा.सोपान जाधव यांच्यासह नुकसानग्रस्त शेतकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, गावकऱ्यांनी संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे ही दुर्घटना घडल्याचा आरोप केला.तलावाच्या बांधामध्ये घूस व सायाळ यांनी केलेल्या छिद्रांमुळे बांध कमकुवत झाला होता.याकडे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने ही दुर्दैवी घटना घडली .याला जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी तलावांची नियमित तपासणी व दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात येत आहे. सध्या बाधित शेतकरी मोठ्या संकटात सापडले असून त्यांना तात्काळ आर्थिक मदत, पीक नुकसान भरपाई तसेच पुनर्वसनासाठी शासनाने त्वरित पावले उचलावीत, अशी मागणी येथील शेतकऱ्यांनी केली.

# मतदार यादी पुनरनिरीक्षण मोहिमेत कार्यकर्त्यांनी झोकून काम करावे

## आ. सुहास बाबर : शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक

**जयसिंगपूर : हॅलो प्रभात**

मतदार यादीतील अचूकता हीच निवडणुकीतील विजयाची गुरुकिल्ली असल्याचा ठाम संदेश देत आ.सुहास बाबर यांनी शिरोळ तालुक्यातील कार्यकर्त्यांना बीएलए (मतदार यादी पुनरनिरीक्षण) मोहिमेत सक्रियपणे सहभागी होण्याचे आवाहन केले. जयसिंगपूर येथील इंगळे सभागृहात शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक कार्यकर्त्याने घराघरांत जाऊन मतदारांची नावे तपासणे, दुबार व मृत नावे वगळणे तसेच नवीन मतदारांची नोंद करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. "जिथे मतदार यादी मजबूत, तिथे सत्ता मजबूत," असा विश्वास व्यक्त करत दररोज किमान एक तास या कामासाठी देण्याचे निर्देश त्यांनी दिले. बीएलएचे ऑनलाईन प्रशिक्षण लवकरच सुरू होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.



यावेळी खा.धैर्यशील माने यांनी मतदार यादी शुद्धीकरण मोहिमेचे महत्त्व अधोरेखित करत कार्यकर्त्यांनी अधिक जबाबदारीने काम करण्याचे आवाहन केले. महिलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत प्रत्येक पात्र नागरिकाचा समावेश व्हावा, यासाठी बीएलएची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तर आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी प्रत्येक बूथवर किमान दोन ते तीन कार्यकर्ते नियुक्त करून एकही मतदार वगळला जाणार नाही याची दक्षता घ्यावी, असे सांगितले. पुढील २० ते २५ दिवस अत्यंत निर्णायक असून, या काळात केलेले काम निवडणुकांच्या निकालावर थेट परिणाम करणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या मोहिमेत शिरोळ तालुक्यात ३५ ग्रामपंचायतींच्या निवडणुका लक्षात घेऊन कार्यकर्त्यांनी घराघरात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी शिवसेना उबाठा गटाचे शिरोळ शहर प्रमुख सतिश चव्हाण, पिंटू हेरवाडे, ग्रामपंचायत सदस्य अमोल माने यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला.

कार्यक्रमास मुरलीधर जाधव, प्रमोददादा पाटील, समाजकल्याण सभापती श्रध्दाताई गायकवाड, जिल्हा परिषद सदस्या प्रचिता कोळी, अमोल चव्हाण, जयसिंगपूरच्या उपनगराध्यक्षा अनुराधा आडके, सागर शंभुशेटे, प्रा. चंद्रकांत मोरे, शितल गतारे, पंचायत समिती सदस्या दिप्ती जाधव यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सुत्रसंचलन बबन यादव यांनी केले. आभार शिवसेना तालुकाप्रमुख उदय झुटाळ यांनी मानले.

# औषधतुला उपक्रमातून गरजू रुग्णांना दिलासा



**सांगली : हॅलो प्रभात**

समाजाभिमुख उपक्रमातून वाढदिवस साजरा करण्याची परंपरा जपत आमदार सुधीर दादा गाडगीळ यांच्या वाढदिवसानिमित्त स्वदेशी फार्मासिटिकल सांगली व भाजप जैन प्रकोष्ठ यांच्या वतीने औषधतुला उपक्रम उत्साहात संपन्न झाला.

या उपक्रमातून जमा झालेली औषधे आ.गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाने सांगली येथील शासकीय (सिव्हिल) रुग्णालयात गरीब व गरजू रुग्णांना मोफत वाटपासाठी रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रकाश गुरव यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यावेळी उप अधिष्ठाता डॉ.श्रीकांत अहंकारे, डॉ. रुपेश शिंदे, डॉ. दळवी ,समाजसेवा अधीक्षक वैद्यकीय विभाग प्रमुख संजय खाडे प्रशासकीय अधिकारी श्री.भोरे, तसेच स्वदेशी उद्योग समूहाचे संचालक हर्षद पाटील, विपुल पाटील उपस्थित होते. याशिवाय स्वदेशी उद्योग समूहाचे कर्मचारी व सिव्हिल हॉस्पिटलमधील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य सेवेच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला असून, या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# संघटन सृजन अभियानांतर्गत काँग्रेसच्या जिल्ह्यात आढावा बैठका



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

काँग्रेस पक्षाच्या संघटन सृजन अभियानांतर्गत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये तसेच कोल्हापूर व इचलकरंजी शहरात १३ एप्रिल ते १८ एप्रिल या कालावधीत आढावा बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत. या बैठकीत नवीन पदाधिकारी नेमणुकीसंदर्भात चर्चा करण्यात येणार असल्याची माहिती कोल्हापूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सचिन चव्हाण यांनी दिली.

अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या अभियानात जिल्ह्यातील संघटन बळकट करण्यावर भर दिला जाणार आहे. खासदार शाहू महाराज छत्रपती आणि विधानपरिषदेतील काँग्रेसचे गटनेते आमदार सतेज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठका पार पडणार आहेत. या बैठकांना पक्षाचे मुख्य निरीक्षक जयशंकर पाठक यांच्यासह महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस सचिन सावंत, प्रदेश सचिव नंदकुमार कुंभार, राहुल गायकवाड, खासदार प्रतिभा धानोरकर, सुनील मलके आणि राहुल वरदा उपस्थित राहणार आहेत.

या अभियानात काँग्रेसचे सर्व तालुकाध्यक्ष, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच पक्षाशी जोडले जाण्याची इच्छा असलेल्या नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सचिन चव्हाण यांनी केले आहे.

# श्री गणेश नागरी पतसंस्थेला २.२९ कोटींचा निव्वळ नफा : चेअरमन सोमनाथ यरनाळकर

**मुरगूड : हॅलो प्रभात**

येथील श्री. गणेश नागरी सहकारी पतसंस्थेने २०२५-२६ या आर्थिक वर्षात २ कोटी २९ लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळवला असून वार्षिक उलाढाल ६६३.६२ कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याची माहिती चेअरमन सोमनाथ यरनाळकर यांनी दिली. संस्थेच्या प्रगतीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, स्व.सदाशिवराव मंडलिक यांच्या प्रेरणेतून १९८९ साली स्थापन झालेली ही संस्था अवघ्या ३७ वर्षांत वटवृक्षासारखी विस्तारली असून लाखो लोकांच्या आर्थिक उन्नतीत मोलाचा वाटा उचलत आहे. माजी खासदार संजय मंडलिक यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची प्रगती सातत्याने होत असल्याचे त्यांनी नमूद केले. अहवाल वर्षात संस्थेकडे १३२.७ कोटी रुपयांच्या ठेवी जमा झाल्या असून १०४.५१ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. यामध्ये ४३.४२ कोटी रुपयांची सोनेतारण कर्जे आहेत. संस्थेची गुंतवणूक ४७.२९ कोटी, राखीव व इतर निधी १३.४४ कोटी, तर खेळते भांडवल १५५.३१ कोटी इतके आहे. वसूल भागभांडवल ४६.४० लाख रुपये असून संस्थेला 'अ' दर्जाचे ऑडिट मानांकन प्राप्त झाले आहे. सभासदांना १५ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. दरम्यान, संस्थेला 'आदर्श पतसंस्था' व 'ब्रँडस् कोल्हापूर' पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. यावेळी व्हा.चेअरमन राजाराम कुडवे यांच्यासह संचालक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# गुलाबराव पाटील होमिओपॅथी कॉलेज मध्ये 'होमिओपॅथी दिन' साजरा

**मिरज : हॅलो प्रभात**

गुलाबराव पाटील मेमोरियल ट्रस्टच्या होमिओपॅथी मेडिकल कॉलेज मध्ये सॅम्युअल हॅनेमन यांचा जन्म दिवस जागतिक होमिओपॅथी दिन म्हणून साजरा करण्यात आला. होमिओपॅथी औषधोपचारामुळे क्लिष्ट व गुंतागुंतीचे रोग बरे होतात.

आज जगातील १०० देशामध्ये होमिओपॅथीने रुग्णावर उपचार केले जातात. या उपचार पध्दतीचा प्रचार व प्रसार करुन रुग्णांच्या वेदना कमी करण्यासाठी जनतेत जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी गुलाबराव पाटील होमिओपॅथी कॉलेज तर्फे प्रयत्न केले जातात.



प्रारंभी होमिओपॅथीचे जनक सॅम्युअल हॅनेमन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रवी डॉक्टर उपस्थित होते. त्यांनी होमिओपॅथी औषधोपचार पध्दतीवर विद्यार्थ्यांना छान मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक चेअरमन पृथ्वीराज पाटील, संस्थेचे विश्वस्त वीरेंद्रसिंह पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी संस्थेचे कॅम्पस कोऑर्डिनेटर डॉ सतीश पाटील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ प्रताप भोसले, डॉ राजेंद्र मेथे, डॉ बिडीवाले, सेमिनार कमिटी प्रमुख डॉ अंजली कुलकर्णी, मेंबर डॉ नारायणी वालावलकर, सर्व विभागाचे प्रमुख व विद्यार्थी उपस्थित होते.

# 'आरआयटी'चा युरोपियन युनियन सेंटरसोबत सामंजस्य करार

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

येथील राजारामबापू इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी या स्वायत्त महाविद्यालयाचा युरोपियन युनियन एंगेजमेंट अँड इन्फॉरमेशन सेंटरसोबत सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे विद्यार्थ्यांना युरोपियन देशांतील शैक्षणिक व करिअर संधी उपलब्ध होणार आहेत. या उपक्रमांतर्गत आरआयटीमध्ये 'सेंटर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्यात येणार असून, त्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना युरोपियन भाषा, संस्कृती तसेच परदेशातील शिक्षणासाठी आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. या करारासाठी स्पेन अकॅडमिक लँग्वेज अँड कल्चरल सेंटर (स्पेन दूतावास) आणि बेस्ट ग्रुप यांचे सहकार्य लाभले.

या करारावेळी प्रा.मनोज चौहान, प्रा. जस्मित सैनी, माजी मंत्री जयंत पाटील, नियामक मंडळ सदस्य शामराव पाटील, कासेगाव एज्युकेशन



सोसायटीचे सचिव आर. डी. सावंत व आरआयटीचे संचालक डॉ.पी.व्ही.कडोले उपस्थित होते.

या प्रसंगी आ.जयंत पाटील यांनी विद्यार्थ्यांना युरोपमध्ये शिक्षणासाठी मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळणार असल्याचे सांगितले. डॉ. कडोले यांनी या करारामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्य, परदेशी शिक्षण, प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी वाढणार असल्याचे स्पष्ट केले. या सामंजस्य करारामुळे आरआयटीचे जागतिक शैक्षणिक संस्था व उद्योगांशी संबंध दृढ होऊन महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर पडणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी आर.डी.सावंत, शामराव पाटील आणि उपस्थित मान्यवरांनी सर्वांचे अभिनंदन केले.

# शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने महात्मा फुले जयंतीनिमित्त अभिवादन



**सांगली : हॅलो प्रभात**

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने सांगली जिल्हा कार्यालयात अभिवादन करण्यात आले. यावेळी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित पदाधिकाऱ्यांनी फुले यांच्या सामाजिक समता, स्त्री शिक्षण व शोषितांच्या हक्कांसाठी केलेल्या कार्याचा गौरव केला. त्यांच्या विचारांचा अंगीकार करून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

यावेळी सांगली विधानसभा क्षेत्र अध्यक्ष सचिन जगदाळे यांच्यासह आयुब बारगिर, विजय माळी, तानाजी गडदे, डॉ. शुभम जाधव, महालिंग हेगडे, सुभाष तोडकर, इर्शाद पखाली, शितल खाडे, दत्ता पाटील, नंदकुमार घाडगे, लक्ष्मण मोने, श्रीशैल्य ढोले आदी पदाधिकारी उपस्थित होते.


# घोडावत ऑलिम्पियाड स्कूलचे डॉ.होमी भाभा परीक्षेत यश

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

मुंबई सायन्स टिचर्स असोसिएशनच्या वतीने राज्यस्तरावर घेण्यात आलेल्या डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेमध्ये संजय घोडावत ऑलिम्पियाड स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी करत, तब्बल १० पदके जिंकली. ज्यात ३ सुवर्ण, ५ रौप्य आणि २ कांस्य पदकांचा समावेश आहे. आर्यन प्रसन्न पवार, आध्या पुशान चिकली, आदित्य अभिजीत जाधव यांनी सुवर्णपदक पटकावले. रौप्य पदक प्राप्त



आध्या चिकली



आर्यन पवार



अदित्य जाधव

करणाऱ्यांमध्ये ऐशना कुलकर्णी, अर्जुन बरगाले, समृद्धी बडे, चिरायू माने, शार्दुल कुलकर्णी यांचा तर कांस्यपदक प्राप्त करणाऱ्यांमध्ये साची सुहास वाडकर, रुद्रराज सुरेश जाधव या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांना या संस्थेचे झोनल हेड श्री प्रभु श्रीनिवास सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी केलेल्या उत्कृष्ट नियोजित अभ्यासक्रमामुळेच हे यश प्राप्त होऊ शकले. या विद्यार्थ्यांना संस्थेचे संचालक श्री वासू सर या प्रसंगी बोलताना ते म्हणाले कि सातत्य व सराव हीच यशाची गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता वाढीसाठी संजय घोडावत ओलंपियाड स्कूल ने सातत्य राखले आहे. चेअरमन संजय घोडावत व विश्वस्त विनायक भोसले यांनी सर्व मार्गदर्शक शिक्षक,गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# गरवारे महाविद्यालयात महात्मा फुले जयंती उत्साहात



**सांगली : हॅलो प्रभात**

वुइमेन्स एज्युकेशन सोसायटीच्या श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयात महात्मा ज्योतिराव फुले यांची १९९ वी जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. सामाजिक समता, स्त्री शिक्षण आणि शोषितांच्या हक्कांसाठी आयुष्यभर लढा देणाऱ्या फुले यांच्या कार्याचा जागर यावेळी करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. अनिल सुगते यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. उपस्थितांनी त्यांच्या कार्याला अभिवादन करत विचारांचे स्मरण केले. प्रास्ताविकात आय.क्यू.एस.सी. समन्वयक डॉ. उर्मिला क्षिरसागर यांनी फुले यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत स्त्री शिक्षण व सामाजिक समतेसाठी केलेल्या योगदानावर प्रकाश टाकला.

प्राचार्य डॉ. सुगते यांनी आपल्या मनोगतातून महात्मा फुले यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता अधोरेखित केली. समाजातील प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा, यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची आठवण करून देत विद्यार्थिनींनी त्यांच्या विचारांचा अंगीकार करावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास उपप्राचार्या डॉ. नंदिनी काळे, पर्यवेक्षिका सुनीता माळी, अधीक्षक देविदास मुंढे यांसह प्राध्यापक व विद्यार्थिनींची उपस्थिती होती. आभार प्रा. (डॉ.) रोहिणी देशपांडे यांनी मानले.

# महात्मा फुले शिक्षण, समता आणि सामाजिक न्यायाचा दीपस्तंभ : डॉ.मिलिंद हुजरे

**तासगाव : हॅलो प्रभात**

थोर समाजसुधारक, शिक्षणप्रणेते व स्त्रीशिक्षणाचे जनक महात्मा जोतीबा फुले हे शिक्षण, समता आणि सामाजिक न्यायाचा दीपस्तंभ आहेत असे उद्गार प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांनी पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना काढले. ते पुढे म्हणाले शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांना उन्नतीचा मार्ग दाखविण्याचे





कार्य महात्मा फुले यांनी केले. त्यांनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून समाजात समानतेचा आणि प्रबोधनाचा दीप प्रज्वलित केला. त्यांच्या कार्यामुळे समाजात सामाजिक न्याय, समता आणि बंधुभाव यांची जाणीव निर्माण झाली.आजच्या आधुनिक समाजातही महात्मा फुले यांचे विचार तितकेच प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहेत.शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवून आणण्याचा त्यांचा आदर्श प्रत्येकाने जपणे आवश्यक आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी ज्ञान, सामाजिक बांधिलकी आणि मानवतेच्या मूल्यांचा स्वीकार करावा असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम कमिटी प्रमुख डॉ. साईनाथ घोगरे यांनी केले तर आभार डॉ.अमोल सोनवले यांनी मानले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.आण्णासाहेब बागल यांनी केले.कार्यक्रमाला रोटरी क्लबचे अध्यक्ष तानाजीराव पाटील,कार्यक्रम आधिकारी डॉ.तातोबा बदामे , कॅप्टन डॉ.विनोदकुमार कुंभार, डॉ. नितीन गायकवाड, प्रा.पल्लवी मिरजकर अधिक्षक एम.बी कदम यांच्यासह सर्व विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक उपस्थित होते.

# आजचे विद्यार्थी उद्याचे जबाबदार नागरिक : श्रद्धाताई गायकवाड

## कनवाड येथे सत्कार व निरोप समारंभ उत्साहात

**शिरोळ : हॅलो प्रभात**

कनवाड (ता.शिरोळ) येथे ग्रामपंचायत, उर्दू विद्यामंदिर, मराठी विद्यामंदिर व सर्व अंगणवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने नूतन लोकप्रतिनिधींचा सत्कार तसेच इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती श्रद्धाताई गायकवाड उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांनी केवळ शालेय शिक्षणापुरते मर्यादित न राहता जीवनमूल्ये, चांगले संस्कार व सामाजिक जाणीव अंगीकारावी, असे आवाहन केले. शिक्षणामुळे व्यक्तिमत्त्व विकास, आत्मविश्वास आणि अडचणींवर मात करण्याची ताकद मिळते, असे त्यांनी सांगितले.

सातत्य, मेहनत आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर ध्येय निश्चित करून ते गाठावे, असा





संदेश त्यांनी दिला.कार्यक्रमात पंचायत समिती सभापती मिलिंद कुरणे, उपसभापती मनीषा कदम, जिल्हा परिषद सदस्य अमोल चव्हाण आदी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास ग्रामस्थ, शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुयोग्य नियोजनामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# प्रभाग क्र. ८ मधील जी. डी. पाटील कॉलनीत वृक्षारोपण

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग क्रमांक ८ मधील जी. डी. पाटील कॉलनी येथील ओपन स्पेसमध्ये वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत सुमारे ५० वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या उपक्रमात स्थानिक नगरसेवक विष्णू आण्णासाहेब माने यांच्या पुढाकारातून वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी दिलीप मोहिते, दिपक घोरपडे, अतिश मोरे, तुळशीराम हांकरे, शिवाजी



### नगरसेवक विष्णू माने यांचा पुढाकार

माने, आण्णा गेजगे, रोहन कांबळे, सुदर्शन निरलगी, राहुल जाधव यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.वृक्षारोपणानंतर या झाडांचे संगोपन करण्याची जबाबदारीही नागरिकांनी स्वीकारली. वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर अशा उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित करत पर्यावरण संवर्धनासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. स्थानिक पातळीवर राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे परिसरात हरित वातावरण निर्माण होण्यास मदत होणार असून, नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जनजागृती होण्यासही हातभार लागणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जे.एस.पी.एम.मध्ये राष्ट्रीय प्रकल्प सादरीकरण स्पर्धेचे यशस्वी आयोजन

**पुणे : हॅलो प्रभात**

जे.एस.पी.एम.च्या भिवराबाई सावंत इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, वाघोली, पुणे येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकी विभाग व आय.ई.टी.ई. पुणे सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय स्तरावरील प्रकल्प सादरीकरण स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा 8 एप्रिल 2026 रोजी पार पडली.या स्पर्धेत 120 हून अधिक संशोधन प्रकल्प सादर करण्यात आले. महाराष्ट्रासह तामिळनाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटक तसेच नांदेड, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, धाराशिव येथील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन डॉ. रवींद्र डी. खराडकर यांच्या हस्ते झाले. विविध तज्ज्ञांनी प्रकल्पांचे मूल्यांकन केले. डॉ. खराडकर यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, इंडस्ट्री 4.0 व 5.0 तसेच आयओटी यांचे महत्त्व स्पष्ट केले. प्राचार्य टी.के. नागराज यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विभागप्रमुख डॉ. योगेश अनगळ यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या उपक्रमाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### शिवानी चव्हाण ची ठाणे शहर पोलिस पदी निवड

**पेठवडगाव : हॅलो प्रभात**



सावर्डे (ता. हातकणंगले) येथील शिवानी जालिंदर चव्हाण हिची ठाणे शहर पोलिस पदी निवड झाली आहे. अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण प्रयत्न, कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावर तिने हे यश संपादन केले आहे. शिवानी चव्हाण हिला न्यू ज्ञानोदय अकॅडमीचे विशाल पाटील तसेच वडील जालिंदर चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रेरणा व सहकार्यामुळे तिने स्पर्धा परीक्षेत यश मिळवत पोलिस सेवेत प्रवेश केला. शिवानीच्या या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना विशेषतः मुलींना मोठे प्रोत्साहन मिळत असून, तिच्या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक व अभिनंदन होत आहे.



### महात्मा फुले यांनी प्रत्येक क्षेत्रात ठसा उमटवला : प्रशांत सरुडकर

**नातेपुते : हॅलो प्रभात**

नातेपुते येथे महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख व्याख्याते प्रशांत सरुडकर म्हणाले की, संघर्ष करायचा असेल तर देशातील नागरिकांना सक्तीचे शिक्षण देणे आवश्यक आहे, तरच समाजात परिवर्तन घडेल. महात्मा फुले हे कर्ते सुधारक होते. त्यांनी 1851 मध्ये पुण्यात पहिली शाळा सुरू करून शिक्षणक्षेत्रात क्रांतिकारी पाऊल उचलले. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांनी आर्थिक क्रांतीचा प्रयत्न केला. त्यांच्या साहित्यामुळे समाजात मोठे परिवर्तन घडले असून त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी रणजीत जठार, मुख्याधिकारी विकास शिंगाडे, एन.के. साळवे, सुनील साळवे, राजकुमार हिवरकर, अभिजीत वाळके यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समितीच्या वतीने महात्मा फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास ज्येष्ठ नगरसेवक बी.वाय.राऊत, चेअरमन अंबादास बरडकर, अशोक राऊत, नवाज सोरटे, सदाशिव काळे, प्रवीण काळे, संघर्ष सोरटे तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

### राहुरी व्यापारी नागरी पतसंस्थेची दमदार कामगिरी

**राहुरी : हॅलो प्रभात**



राहुरी तालुका व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेने सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करत २० लाख ३३ हजार रुपयांचा निव्वळ नफा मिळविला आहे. संस्थेचा ताळेबंद संस्थापक चेअरमन प्रकाश पारख यांच्या हस्ते जाहीर करण्यात आला. संस्थेने स्थापनेपासून सातत्याने सभासदांना ११ टक्के लाभांश दिला असून काटेकोर कर्जवाटप व प्रभावी वसुली धोरणामुळे प्रगतीचा आलेख उंचावत आहे. सध्या संस्थेकडे १८.२९ कोटी रुपयांच्या ठेवी, १७.०७ कोटी रुपयांचे कर्ज वितरण व ६.४८ कोटी रुपयांची गुंतवणूक आहे. एनपीए ४.२७ टक्के इतका असून संस्थेने लेखापरीक्षणात 'अ' वर्ग कायम राखला आहे. या वर्षी संस्थेला १.११ कोटी रुपयांचा ढोबळ नफा झाला असून सर्व तरतुदीनंतर निव्वळ नफा २०.३३ लाख रुपये राहिला आहे. रौप्यमहोत्सवी वर्षात २५ कोटी ठेवींचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून ग्रामीण भागात नवीन शाखा सुरू करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे.पुढील वर्षी सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याचा प्रस्ताव असून शेतकरी, कष्टकरी व व्यापाऱ्यांच्या सहकार्याने हे उद्दिष्ट पूर्ण होईल, असा विश्वास संस्थापक चेअरमन व उपाध्यक्षांनी व्यक्त केला.

### दैवी शक्तीचे आमिष दाखवून भोंदूकडून महिलेवर लैंगिक अत्याचार

**पुणे : हॅलो प्रभात**

अंगात दैवीशक्तीचा संचार असून, कौटुंबिक वादात तोडगा काढण्याचे आमिष दाखवत एका भोंदूने महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या भोंदूने बांधकाम व्यवसायात गुंतवणुकीवर चांगल्या परताव्याचे आमिष दाखवून या महिलेला ५० लाख ५५ हजार रुपयांचा गंडा घातला. या प्रकरणी स्वारगेट पोलिसांनी भोंदूविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# भेसळयुक्त आंबारस जप्त

## अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

**राजगुरूनगर : हॅलो प्रभात**



राजगुरूनगर जवळील राक्षेवाडी येथे अन्न व औषध प्रशासनाने कारवाई करून भेसळयुक्त आंबारस व मँगो पल्प तयार करण्यासाठीचे भेसळयुक्त साहित्य आणि रसायनाचा साठा जप्त करून नष्ट केला. सुमारे अडीच लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल पाहुन अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारीही ग्रामीण भागातील हा भेसळयुक्त प्रक्रिया प्रकल्प पाहून चकित झाले होते.

राक्षेवाडी येथील पुरवठादार व मावळ तालुक्यात उर्से येथील महंमद एकरामुल उर्फ अक्रम गुलाम यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. कारवाईत मँगो पल्प व मँगो पल्प तयार करण्यासाठीची भेसळयुक्त साखर, दुध, रसायनमिश्रीत मुद्देमाल अन्न व रंग आदी मुद्देमाल प्रशासनाने कारवाई करून जप्त केला.

सध्या ग्रामीण भागात यात्रा व लग्न सिझन असल्याने मँगो पल्पचा तयार आंबारस वापरण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. शंभर रुपयात एक किलो तयार आंबारस मिळत असल्याने लोकांना हा आमरस वापरण्याची भुरळ पडली आहे. परंतु हा मँगो पल्प शंभर टक्के भेसळयुक्त व केमिकल वापरून बनवला जातअसल्याचे आता उघड होत आहे. भेसळयुक्त आंबारस मुळे जुलाब, उलट्या, पोटदुखी आणि अन्नातून विषबाधा होण्याचा मोठा धोका असतो. रंगाचा अतिवापर आणि हानिकारक रसायनांच्या वापरामुळे दीर्घकालीन कर्करोगासारखे गंभीर आजार उद्भवू शकतात. असे याविषयी बोलताना सहायक आयुक्त ना. रा. सरकटे यांनी सांगितले. अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या येथील कारवाईत तब्बल तीन हजार २८२ किलो भेसळ व केमिकलयुक्त मँगोपल्पचा आंबारस नष्ट करण्यात आला. या कारवाईत अन्न व औषध प्रशासन विभागातील सहायक आयुक्त ना. रा. सरकटे, दक्षता विभागाचे अधिकारी वा. औ. शिंदे, स्वा. दा. मस्के, प्र. शि. कच्छवे सहभागी झाले होते.

## शरद जरे यांच्याकडे पणन संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार

**जामखेड : हॅलो प्रभात**



मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव शरद जरे यांच्याकडे पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. या संदर्भातील शासन आदेश जारी करण्यात आला असून हा निर्णय 7 एप्रिल 2026 पासून लागू करण्यात आला आहे. यापूर्वी या पदावर संजय कदम कार्यरत होते. त्यांच्या जागी आता शरद जरे यांच्याकडे ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. पुढील आदेश येईपर्यंत ते या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळणार आहेत. सदर आदेश उपसचिव नितीन गायकवाड यांनी राज्यपालांच्या आदेशानुसार काढला आहे. शरद जरे यांची शिस्तबद्ध व कडक अधिकारी म्हणून ओळख असून मुंबई APMC मध्ये सचिव म्हणून कार्यरत असताना त्यांनी अनेक गैरव्यवहारांवर कारवाई केल्याचे सांगितले जाते. त्यांच्या कामकाजाची दखल घेऊनच त्यांच्याकडे अतिरिक्त जबाबदारी देण्यात आल्याची चर्चा आहे. या निर्णयामुळे राज्यातील प्रमुख बाजार समित्यांच्या कामकाजात अधिक गती व समन्वय वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## पेठवडगाव ते माणगाव भव्य संविधान समता रॅलीचे आयोजन

**पेठवडगाव : हॅलो प्रभात**



सावर्डे (ता. हातकणंगले) येथील शिव स्वामी बहुउद्देशीय संस्था, कोल्हापूर, महाराष्ट्र यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त पेठवडगाव ते माणगाव भव्य संविधान समता रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली दिनांक 14 एप्रिल रोजी सकाळी 7 वाजता पेठवडगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून सुरू होणार आहे. त्यानंतर ही रॅली मोजे तासगाव, मिनचे, सावर्डे, नरंदे, भेंडवडे, कुंभोज, नेज, आळते, मजले या मार्गाने माणगाव स्मृतीस्थळापर्यंत जाणार असून तेथे रॅलीची सांगता होणार आहे. रॅलीदरम्यान निवडक गावांमध्ये जनजागृतीच्या उद्देशाने भारतीय संविधानाचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त साखर व पेढ्यांचे वाटप करून अभिवादन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राहुल सावर्डेकर, नितीन कदम सर, प्रा. अंकुश कुरणे, दीपक गोंधळी, प्रवीण चव्हाण, उमेश पाटील (पत्रकार), योगेश कांबळे, सुरज कांबळे, सुहास तोडकर, संकेत कांबळे, वैभव कांबळे, संस्थेचे सल्लागार अॅड. श्रीकांत मालेकर तसेच संस्थेच्या संचालक मंडळाने केले आहे.

## राजर्षी शाहू विकास आघाडीच्या यशाबद्दल लोकप्रतिनिधींचा सत्कार

**जयसिंगपूर : हॅलो प्रभात**




यड्रावकर प्रेमी व विकास कांबळे मित्र परिवार यांच्या वतीने राजर्षी शाहू विकास आघाडीला शिरोळ तालुक्यात मिळालेल्या अभूतपूर्व यशाबद्दल सर्व नूतन लोकप्रतिनिधींचा जाहीर सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास आमदार डॉ. राजेंद्र पाटील-यड्रावकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर नवनियुक्त सदस्यांना संबोधित करताना जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याचे आवाहन केले. लोकांनी दिलेल्या विश्वासाचे चीज करताना प्रत्येक निर्णय हा लोकहिताचा असावा, असे त्यांनी स्पष्ट केले. समाजातील गरजू, वंचित घटकांपर्यंत शासनाच्या सर्व योजना पोहोचवणे ही प्रत्येक सदस्याची जबाबदारी आहे. पद हे केवळ अधिकारासाठी नसून सेवा करण्याची मोठी संधी आहे. आपल्या कार्यातून समाजात सकारात्मक बदल घडवून आणणे, पारदर्शकता राखणे आणि लोकांशी सतत संवाद ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार समाजकार्य करत राहावे, यामुळेच समाजाचा सर्वांगीण विकास साधता येईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. यावेळी समाजकल्याण समिती सभापती सौ. श्रद्धाताई गायकवाड, शिरोळ पंचायत समिती सभापती श्री. मिलिंद कुरणे, जिल्हा परिषद सदस्य श्री. अमोल चव्हाण, श्री. प्रशांत शहापुरे, कुमार कांबळे, सौ. उत्तरादेवी शिंदे सरकार, सौ. प्राचिता कोळी तसेच पंचायत समिती सदस्य प्रतिक पाटील, नाना उपाध्ये, बाबासो वनकोरे, अविनाश पाटील, सौ. दिप्ती जाधव, सौ. सीमा म्हैशाळे, माजी जि.प. सदस्य सौ. रंजना कोळी, दत्त कारखाना संचालक रणजित कदम, नगरसेवक जय कडाळे, सुनील पाटील, प्रा. चंद्रकांत मोरे, अविनाश गायकवाड, विजितबाबा शिंदे सरकार, चंद्रकांत कोळी, प्रशासक मिथुल जाधव, सरपंच सागर भंडारे, सुर्यकांत कोळी आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. चंद्रकांत मोरे यांनी स्वागत केले. प्रस्ताविकामध्ये विकास कांबळे यांनी आघाडीच्या यशाचा आढावा घेत उपस्थितांचे स्वागत केले.

यावेळी पंचायत समिती सभापती मिलिंद कुरणे, समाजकल्याण सभापती सौ.श्रद्धा गायकवाड तसेच बाबासो वनकोरे यांनी आपल्या मनोगतातून आघाडीच्या कार्याचा गौरव करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. रंजना कोळी यांनी केले. तर सुत्रसंचलन शशिकांत मुद्दापुरे यांनी केले. हा सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## समता इंटरनॅशनल स्कूलचा तिहेरी ऐतिहासिक विजय

**कोपरगाव : हॅलो प्रभात**



**विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरावर दमदार छाप**

आयआयटी दिल्ली येथे पार पडलेल्या 10 व्या राष्ट्रीय स्तरावरील रोबोटिक्स व कोडिंग चॅम्पियनशिपमध्ये समता इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत तिहेरी ऐतिहासिक विजयाची नोंद केली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रातील या यशामुळे शाळेचे नाव राष्ट्रीय पातळीवर झळकले आहे.

कोडिंग हॅकॅथॉन प्रकारात प्रज्ञेश सानप, शार्विल गिरवालकर, अवनीश सावला, अनुरूप बजाज, शौनक जोशी व बनित खुराना यांनी उत्कृष्ट बुद्धिमत्ता व संघभावनेच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावत 20 हजार रुपयांचे रोख पारितोषिक मिळवले. सॉकर रोबोटिक्स गटात 'सर्किट स्ट्रायकर' संघाने ईशान कोयटे व रुद्र राठोड यांच्या सहभागाने राष्ट्रीय विजेतेपद पटकावले. या संघाला 'टेकफ्लुएंसर पुरस्कार'ही मिळाला.

लाईन फॉलो रोबोटिक्स स्पर्धेत सुयश शिंदे याने उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय विजेतेपदासह 'टेकफ्लुएंसर पुरस्कार' पटकावला. सर्व विद्यार्थ्यांना संगणक शिक्षक उदय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या यशामागे संस्थापक ओमप्रकाश कोयटे, कार्यकारी विश्वस्त स्वाती कोयटे व प्राचार्य समीर अत्तार यांचे मार्गदर्शन लाभले. स्वाती कोयटे व प्राचार्य अत्तार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या.

## समर्या क्रिएशनचे 'औमोरा म्यूझिक' लॉन्च


**मुंबई : हॅलो प्रभात**



भारतातील पहिली इंटिग्रेटेड क्रिएटर-फर्स्ट कंपनी समर्या क्रिएशनने 'औमोरा म्यूझिक' या नव्या म्यूझिक लेबलचे अंधेरी वेस्ट येथील द क्लबमध्ये अधिकृत लॉन्च केले. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डधारक गीतकार समीर अंजान हे या लेबलचे संस्थापक भागीदार आहेत. औमोरा म्यूझिक हे कलाकार-केंद्रित संकल्पनेवर आधारित असून अल्गोरिदमपेक्षा कलाकारांच्या सर्जनशीलतेला प्राधान्य देणार आहे. सध्या १५० हून अधिक प्लॅटफॉर्मवर १९ ट्रॅक्ससह हे लेबल सक्रिय असून १५० पेक्षा अधिक गाणी रिलीजसाठी सज्ज आहेत. लेबलचे क्रिएटिव्ह नेतृत्व संगीतकार नील गांधी आणि निरज विश्वकर्मा यांच्याकडे असून Jaexellejay हा पहिला प्रमुख कलाकार आहे. २०२६ ते २०३२ दरम्यान ५०० हून अधिक गाणी, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय दौरे आणि आर्टिस्ट डेव्हलपमेंटवर भर देण्याची योजना आहे.

## अनोळखी लिंकवर क्लिक केल्याने ज्येष्ठ नागरिकाचा मोबाईल हॅक

**पुणे : हॅलो प्रभात**



एरंडवणे परिसरातील एका ज्येष्ठ नागरिकास मोबाईलवरील अनोळखी लिंक उघडणे चांगलेच महागात पडले. सायबर चोरट्यांनी या लिंकद्वारे त्यांचा मोबाईल 'हॅक' करून बँक खात्यातून सात लाख ९६ हजार रुपयांची रक्कम परस्पर लांबविल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी एरंडवणे परिसरातील एका ६८ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने अलंकार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ज्येष्ठ नागरिकाचा मोबाईल क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी जोडलेला आहे. काही दिवसांपूर्वी सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाईलवर एका अनोळखी क्रमांकावरून एक लिंक पाठवली. ज्येष्ठ नागरिकाने ती लिंक उघडताच सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाईलवर तांत्रिकदृष्ट्या ताबा मिळवत बँक खात्यातून चोरट्यांनी परस्पर सात लाख ९६ हजार रुपयांची रोकड लांबविली. बँक खात्यातून अचानक एवढी मोठी रक्कम कमी झाल्यानंतर ज्येष्ठ नागरिकास फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यांनी पोलिसांत तक्रार दिली.

**अनोळखी लिंक उघडू नका**

**मोबाईल क्रमांक हॅक करून बँक खात्यातील रोकड चोरण्याचे प्रकार शहरात वाढत आहेत. त्यामुळे नागरिकांनी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. अनोळखी क्रमांकावरून संदेश किंवा व्हॉट्सअॅपवर एखादी अनोळखी लिंक आल्यास ती उघडू नये, असे आवाहन सायबर पोलिसांकडून करण्यात आले आहे.**

# महिला व युवा उद्योजकांचा गौरव

**नाशिक : हॅलो प्रभात**



**नाशिक भूषण पुरस्कार सोहळा संपन्न**

आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित "नाशिक भूषण पुरस्कार सोहळा 2026" हा उपक्रम नाशिक येथे मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. हा सोहळा विशेषतः महिला उद्योजक आणि युवा उद्योजकांना प्रोत्साहन देणारा प्रेरणादायी उत्सव ठरला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री स्वरा राजपूत यांनी उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष आकर्षण प्राप्त झाले आणि उपस्थितांना प्रेरणा मिळाली.

संस्थेचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे मुख्य संयोजक गणेश रामदास विटकर यांच्या नेतृत्वाखाली हा भव्य सोहळा यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी गोदा इंटरटेनमेंटचे दिलीप जाधव, सुप्रसिद्ध निवेदक गणेश मोढवे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उद्योजक, कृषी तज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्यात महिला उद्योजकांनी व्यवसाय क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा विशेष गौरव करण्यात आला. घर आणि व्यवसाय यांचा समतोल साधत त्यांनी मिळवलेले यश हे समाजासाठी प्रेरणादायी ठरले. तसेच युवा उद्योजकांनी नवीन तंत्रज्ञान, नवकल्पना आणि आधुनिक व्यवसाय पद्धतींचा वापर करून नाशिकच्या नावाला राज्यभरात नवी ओळख दिली आहे. "नाशिक भूषण पुरस्कार 2026" च्या माध्यमातून उद्योजकांना केवळ सन्मानित करण्यात आले नाही, तर त्यांना त्यांच्या व्यवसायात पुढे जाण्यासाठी एक मजबूत प्लॅटफॉर्म, नेटवर्किंग संधी आणि नवीन दृष्टीकोन देण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामुळे अनेक उद्योजकांना त्यांच्या व्यवसायात मोठा "ब्रेकथ्रू" मिळण्याची संधी निर्माण झाली आहे. यावेळी बोलताना अध्यक्ष गणेश विटकर म्हणाले, "महिला आणि युवा उद्योजक हे आपल्या समाजाचे भवितव्य आहेत. त्यांना योग्य वेळी प्रोत्साहन आणि सन्मान मिळाला, तर ते नाशिकसह संपूर्ण महाराष्ट्राचे नाव उंचावू शकतात." कार्यक्रमादरम्यान संस्थेतर्फे महिला आणि युवा उद्योजकांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिरे, व्यवसाय प्रशिक्षण कार्यशाळा आणि नेटवर्किंग प्लॅटफॉर्म सुरू करण्याची घोषणा करण्यात आली. एकूणच, "नाशिक भूषण पुरस्कार सोहळा 2026" हा कार्यक्रम केवळ पुरस्कार वितरणापुरता मर्यादित न राहता, नाशिकला एक उद्योजकीय हब म्हणून ओळख मिळवून देणारा आणि नव्या पिढीला प्रेरणा देणारा भव्य उपक्रम ठरला.